


# निसर्गातील नवलाई



पंढरीनाथ रेगे



BVBK-0402669

२६६९
१८/४/९२

बालक-पालक साहित्य

# निसर्गातील नवलाई

पंढरीनाथ रेगे

शासनालय
२६६९ १८/४/९२
विषय बाल
BVBK-0402669

आदित्य प्रकाशन

प्रथमावृत्ती : ११ सप्टेंबर १९९१ (गणेश चतुर्थी)

लेखक **पंढरीनाथ रेगे**
'घरकुल' शास्त्रीनगर, धायरी,
पुणे-४११०४१.

© प्रकाशक : **किरण गोखले**
**आदित्य प्रकाशन**
७८, पत्रकार कॉलनी,
बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१.
दूरध्वनी : ६४०५३४२/६४२२२२९.

रेखाचित्रे : **मुकुंद तळवलकर**


मुखपृष्ठ, नकाशे व सजावट : **सत्यनारायण वडीशेरला**

मुद्रण : **जॉली ऑफसेट**
वडाळा उद्योग भवन,
मुंबई-४०००३१.

टाइपसेटिंग : **शार्पो टाइप्स**
मुंबई.

## मूल्य : रु. ६०/-

ISBN: 81-85345-10-4



# प्रकाशकाचे मनोगत

पार आदिमानवाच्या काळापासून निसर्गातील नवलाई माणसाला अचंबित करत आली आहे. किंबहुना, निसर्ग आणि नवलाई यांचे नातेच अतूट आहे. नित्यनेमाने दररोज उगवणारा व मावळणारा सूर्य, पौर्णिमेनंतर कलेकलेने क्षीण होत जाणारा व अमावस्येला गायब होणारा चंद्र, अचानक आकाशात झेपावलेला धूमकेतू, छोट्याशा बीपासून निर्माण होणारा प्रचंड वृक्ष व भरती-ओहटीच्या झोक्यावर सदैव झुलणारा अथांग सागर - या सर्वांची नवलाई माणसाला नेहमीच थक्क करून सोडत असे.

पुढे जसजशी विज्ञानाची प्रगती होत गेली तसतशी या नवलाईमागची शास्त्रीय कारणे माणसाच्या ध्यानात आली व या सतत आढळणाऱ्या गोष्टींची 'नवलाई' उरली नाही. पण आज मानवाची उत्पत्ती झाल्यानंतर लक्षावधी वर्षे उलटून गेली तरी निसर्गाची अद्भुतता संपलेली नाही.

आजही एके दिवशी अचानक पांढराशुभ्र कावळा आढळतो, पायात कडी अडकवलेला हाताच्या बोटाएवढा चिमुकला नाजूक पक्षी आपल्या मूळ घरापासून हजारो मैल दूर जाळ्यात अडकतो, जगातल्या सर्व प्राण्यांना कधी ना कधी ठार मारल्याची ज्याच्या नावावर नोंद आहे तो जंगलचा राजा-वाघ, कोल्ह्याला मात्र कधीच का मारत नाही असा कूट प्रश्न एखाद्या प्राणीनिरीक्षकाला भंडावून सोडतो, किंवा एखाद्या समुद्रकिनाऱ्यावर हजारो मासे सामुदायिक आत्महत्या करतात. आणि मग आपल्याला जाणवते की निसर्गाच्या पोतडीतील नवलाईचा साठा अजून संपलेला नाही. अनेक आश्चर्यकारक घटनांची कारणमीमांसा आपल्या 'प्रगत' विज्ञानालाही अद्याप सापडलेली नाही.

सुप्रसिद्ध बालसाहित्यकार श्री. पंढरीनाथ रेगे यांनी जगातील निरनिराळ्या भागांत आढळलेल्या निसर्गातील नवलाईच्या १०० प्रकारांचे अभ्यासपूर्ण संकलन **'आदित्य प्रकाशनाच्या बालक-पालक साहित्य मालिकेतील'** या पहिल्या पुस्तकात केले आहे. यात चित्रविचित्र पशुपक्षी आहेत, झाडेझुडपे, कीटक यांच्या गंमतीजंमती आहेत, भूगर्भात आढळणाऱ्या चमत्कारांची वर्णने आहेत.

हे सर्व वाचताना मजा यावी, यात ज्यांच्याबद्दल माहिती दिली आहे ते प्राणी, पक्षी बघितल्याचे आभासात्मक का होईना, समाधान लाभावे म्हणून त्यांची रेखाचित्रे सुप्रसिद्ध चित्रकार श्री. मुकुंद तळवलकर यांनी काढली आहेत. ज्या देशांत हे प्राणी, वृक्ष वगैरे आढळतात त्या देशांचे, खंडांचे सुस्पष्ट नकाशेही यात दिले आहेत. हे नकाशे व पुस्तकाची सजावट केली आहे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कलाकार श्री. सत्यनारायण वडीशेरला यांनी.

पण या पुस्तकाचा उद्देश केवळ मनोरंजन नाही, तर मनोरंजनात्मक विज्ञान आपल्यापर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न आहे. निसर्गातील नवलाईचा हा अविष्कार वाचताना, माझ्या कुमारमित्रांना अशी विनंती आहे की त्यांनी प्रत्येक नवलाईमागची शास्त्रीय कारणमीमांसा शोधण्याचा प्रयत्न करावा.

उदाहरणार्थ, मगर किंवा सुसर जेव्हा एखादा प्राणी गिळंकृत करते तेव्हा तिच्या डोळ्यांमधून अश्रू ठिबकतात, ज्यांना 'नक्राश्रू' असे नाव आहे. 'अहिंसावादी' मगरीला प्राणी खाल्ल्याचा खरोखर पश्चाताप होतो काय? प्राणिशास्त्र सांगते की मगर एखादा प्राणी जेव्हा गिळून टाकते, तेव्हा तिच्या शरीरातील क्षारांचे प्रमाण बेसुमार वाढते व ते क्षार अश्रूंवाटे मगरीच्या शरीरातून बाहेर फेकले जातात.

आपण अशा 'निसर्गातील नवलाई' च्या कारणांचा अवश्य विचार करा. आपल्याला त्याबद्दल काही माहिती मिळत नसल्यास आपल्या पालकांचे किंवा शिक्षकांचे जरूर मार्गदर्शन घ्या.

'निसर्गातील नवलाई' हे पुस्तक तुम्हा सर्वांना आवडेल याची खात्री आहे. आमच्या **बालक-पालक साहित्य'** मालिकेतील हे पहिले पुस्तक. यापुढील पुस्तकेही आपल्याला आवडतील असा विश्वास वाटतो.

**किरण गोखले**
आदित्य प्रकाशन

म. ग्रं. सं. ...
२६६९ ... ९८/१२


# अनुक्रमणिका

## प्राणिजगत


१. दहा तासांत जेवण हवेच
२. आळश्यांचा राजा : सुस्त
३. बदकचोचीचा प्राणी
४. अजब दोस्ती
५. ताकदवान 'ओरँग उटान'
६. महाकाय देवमासा
७. अती वेगवान शीडमासा
८. तिरंदाज मासा
९. महाकाय घोरपड
१०. सर्वांत मोठा बेडूक
११. लांब शेपटीचा वानर
१२. विषारी कातडीचे बेडूक
१३ उंदरासारखा छोटुकला वानर
१४. साप का सरडा ?
१५. कात टाकणारा सरडा
१६. आयाळवाला सरडा
१७. उडता सरडा
१८. सर्वांत मोठे हरिण
१९. डोंगरी सिंह
२०. काळ्या लेमूर वानराची गोरी मादी
२१. सर्वांत मोठे अस्वल
२२. उडती खार
२३. अंगाची गुंडाळी करणारा आर्माडिल्लो
२४. उडणारा प्राणी 'लॉरिस'
२५. स्पंज – एक जलचर प्राणी
२६. दुर्मिळ पांडा
२७ कासवाची विलक्षण कहाणी
२८. बिनहाडांचा जेली फिश
२९. खवले मांजर
३०. शिंगांच्या दोन जोड्या असणारे डोंगरी हरिण
३१. ध्रुव प्रदेशातील पांढरा कोल्हा
३२. विलक्षण प्रवास व मृत्यू
३३. राक्षसी स्क्वीड मासा
३४. माशांची सामुदायिक आत्महत्या
३५. पशु-पक्ष्यांचे प्रचंड कळप
३६. हिवाळाभर झोपणारे प्राणी
३७. पोहणारी घोरपड
३८. समुद्रात पोहणारा विचित्र वानर
३९. अफाट तोंड फाकवणारे मासे
४०. अद्भुत अँगलर मासा
४१. समुद्रकाकडीचे अद्भुत शरीर
४२. तळ्यात झोपडे बांधणारी घूस

## पक्षिजगत


४३. दगडांनी अंडे फोडणारे गिधाड
४४. भैरवीचे सूर आळवणारा पक्षी
४५. सर्वांत मोठा समुद्रपक्षी
४६. उपकारक समुद्रपक्षी
४७. समुद्रपक्ष्यांच्या अफाट वसाहती
४८. पक्ष्यांचे स्मारक
४९. थक्क करणारे अखंड उड्डाण
५०. प्रचंड बहुरंगी पोपट
५१. वेडावणारे पक्षी
५२. सर्वांत वेगवान पक्षी
५३. पिसारावाले कबुतर
५४. "घुबडपुराण"
५५. घाबरविणारा रातवा
५६. हिवाळ्यात लपून बसणारा पक्षी
५७. मुंग्या अंगावर घेणारी पाखरे
५८. खोलवर बुडी मारणारा पक्षी
५९. पंखांची काळजी
६०. एव्हरेस्टवीर कावळा
६१. शहामृगाचा अमेरिकी भाईबंद-ऱ्हिया
६२. शिरस्त्राणधारी कॅसोवरी
६३. किवीची चालाखी
६४. उडू शकणारा सर्वांत जड पक्षी
६५. अंड्यांची अजब राखण
६६. पक्ष्यांचे माहेरघर – मादागास्कर
६७. दगड-लाकूड पचवणारा एमू
६८. विणकर पक्ष्याची सुबक घरबांधणी
६९. खादाड समुद्रपक्षी
७० पाखरे : माणसाहून ताकदवान
७१. पिशवीधारी पेलिकन



## वृक्षवल्लींचे जग


७२. अबब!
७३. नरभक्षक झाड
७४. सर्वांत जुने झाड
७५. लाजाळूच्या रोपट्यांची गंमत
७६. पांघरुण घेतलेले रोपटे
७७. फुलझाडांची प्रचंड पाने
७८. टाचणी वितळवणारी वनस्पती
७९. सर्वांत मोठे फूल
८०. काचेसाठी वापरण्यात येणारे रोपटे
८१. स्वतःचे रक्षण करणारी रोपटी
८२. ब्राझिलमधील टणक झाडे
८३. लंबू बांबू
८४. एकाकी वृक्ष
८५. सर्वांत मोठा निवडुंग


## नवलाईचे जग


८६. सर्वांत मोठे बेट
८७. सागरतळाशी उष्ण पाणी
८८. कीटकांची कमाल!
८९. घुंगुरट्यांची करामत
९०. पिसारावाला 'मोरकिडा'
९१. मुंग्यांचे विलक्षण जग
९२. फुलपाखरांचे झुंडीने स्थलांतर
९३. चुनखडीचा प्रचंड सुळका
९४. जगातला सर्वांत शुष्क प्रदेश
९५. पृथ्वीच्या पोटातले उष्णतामान
९६. ज्वालामुखीची बेटे
९७. ज्वालामुखीची रंगीत डबकी
९८. उष्ण पाण्याची कारंजी
९९. घरमाशीचा बहुदर्शी डोळा
१००. नावाची नवलाई

# प्राणिजगत




कुमारमित्रांनो,

हे तुम्हाला माहीत आहे का?

* उदराना घाम येत नाही.
* घोरपड कधीही पाणी पीत नाही.
* जिराफ कसलाच आवाज काढू शकत नाही.
* 'याक' या हिमालयीन प्रदेशातील म्हशीसारख्या पाळीव जनावराचे दूध गुलाबी रंगाचे असते.
* हत्तीला तीन हजार फूट अंतरावरील माणसाचा 'वास' येऊ शकतो.
* ब्राझिलच्या जंगलात 'कॅपीबारा' जातीची भलीमोठी घूस आढळते. तिचे वजन तब्बल १०० पौंड (सुमारे ४५ किलो) असते..





# १. दहा तासांत जेवण हवेच !

मोल हा उंदराच्या जातीच्या चिचुंद्रीसारखा इटुकला प्राणी. याचे डोके निमुळते असते पण चिचुंद्रीसारखे निमुळते तोंड नसते. याचे पुढचे पाय आखूड असतात व त्यांना टोकेरी नखांचे रुंद पंजे असतात.या पंज्यांच्या साहाय्याने तो जमिनीत बोगद्यासारखे भुयार खणतो आणि आपले मुख्य खाद्य – गांडुळे पकडतो. एका तासात पंधराएक फूट लांबीचे भुयार हा खणू शकतो.

या प्राण्याची लांबी असते केवळ सहा इंच व त्यात शेपटी असते एक इंचाची. डोळे मण्यांसारखे बारीक गोल व ते भोवतालच्या केसांमध्ये लपलेले असतात. मात्र याचे घ्राणेंद्रिय – नाक फारच शक्तिशाली असते. त्याच्या बळावर हा गांडुळांचा अचूक शोध घेतो.

मात्र जमिनीत भुयार खणताना याची खूप शक्ती खर्च होते व त्यापायी त्याला स्वतःच्या वजनाइतकी गांडुळे खावी लागतात. याला उपास अजिबात सोसवत नाही. जर का अशी उपासमार घडलीच तर अवघ्या दहा तासांमध्ये याचे मरण ओढवते.

# २. आळश्यांचा राजा: सुस्त

अस्वलासारखा दिसणारा 'स्लॉथ' (सुस्त) नावाचा केसाळ सस्तन प्राणी दक्षिण अमेरिका, अफ्रिका, इंडोनेशिया व उत्तर ऑस्ट्रेलिया या भागांत आढळतो. हा प्राणी अत्यंत आळशी असल्याने 'सुस्त' किंवा स्लॉथ असे नाव याला दिले गेले आहे. दिवसातील तब्बल अठरा-अठरा तास हा प्राणी झोपून राहतो.

'सुस्त' झोपतो तोसुद्धा विचित्र प्रकारे – झाडाच्या फांदीला उलटे टांगून घेऊन. याच्या पायांना आकडीसारखी बाकदार नखे असतात प्रत्येक पायाला दोन नखे असलेली एक जात असते; तर प्रत्येक पायाला तीन नखे असलेली दुसरी एक जात असते. पायांच्या या नख्यांच्या साहाय्याने फांदीला चारही पायांनी घट्ट पकडून 'सुस्त' फांदीला लटकून तासचे तास खुशाल झोप काढतो. झोपेतही याच्या नख्यांची पकड कधीही ढिली होत नाही.

अस्वलासारखेच याच्या अंगावर दाट, लांब केस असतात. हा प्राणी झाडपाला व फळे खाऊन राहतो. याला पंजे असे वेगळे नसतातच. नख्या हेच याचे पंजे.

क्र. २६६९ दिनांक ९.८.७२
विषय

# ३. बदकचोचीचा प्राणी

बदकासारखी चोच असलेला एक सस्तन प्राणी आहे. त्याचे नाव प्लॅटायपस.बदकासारखेच याच्या पंज्यांना कातडीचे पडदे असतात त्यामुळे त्याला पाण्यात सफाईने पोहता येते.

प्लॅटायपसची मादी अंडी घालण्यासाठी ओढ्याच्या किंवा नाल्याच्या काठाला लागून गवत व पाने यांच्या साहाय्याने घरटे बनवते. या घरट्यामधून पाण्यापर्यंत बोगदा केलेला असतो व घरट्याच्या वरच्या अंगाला हवेसाठी झडप असते.


या प्राण्याची मादी खेळातल्या गोट्यांएवढी दोन किंवा तीन अंडी घालते. ही सगळी अंडी एकमेकांना उभी चिकटलेली असतात. मादी अंडी आपल्या छातीशी कवटाळते आणि स्वतःचे अंग गुंडाळून घेते. अशा तऱ्हेने ती अंडी उबविते. जन्माला आलेली बाळे केसरहित व आंधळी असतात. चार महिन्यांनी त्यांना दिसायला लागते.

गंमत अशी की मादी आपल्या पिल्लांना दूध पाजत असली तरी तिला स्तने नसतात. तिच्या पोटाला असलेल्या छिद्रांमधून दूध पाझरते. ते दूध पोरे चाटून – चाटून पितात.

नराच्या पाठीमागच्या दोन्ही पायांना टोकेरी व धारदार असा एक पोकळ काटा असतो. त्याच्या मुळाशी एक विषारी ग्रंथी असते. या काट्याचा फटका त्याने शत्रूला मारला की जबर जखम होते व यातना होतात.

नवल म्हणजे बदकासारखी चोच असलेल्या या प्राण्याला दातही असतात. किडे व बारीक मासे चावून खाण्यासाठी या दातांचा त्याला उपयोग होतो.

ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, टास्मानिया व न्यू गिनी या देशांत हा प्राणी आढळतो.




# ४. अजब दोस्ती


सुसर आणि 'झिगझॅग' पक्ष्यांची दोस्ती ही निसर्गातील एक अजब दोस्ती मानली पाहिजे.

सुसरी दोन प्रकारच्या असतात. एका जातीला मगर म्हणतात. सरपटणाऱ्या प्राण्यांमध्ये सुसर व मगर हे सर्वांत मोठे प्राणी. यांची भारी ताकद, असंख्य टोकदार दातांनी भरलेल्या भीषण दाढा व खादाडपणा यामुळे माणसे व बहुसंख्य जनावरे त्यांना वचकून असतात. सुसरीचे मुसकट लांब व अरुंद असून दात बारीक असतात तर मगरीचे मुसकट आखूड व रुंद असते. भारत, अफ्रिका, ऑस्ट्रेलिया व दक्षिण अमेरिका या प्रदेशांत सुसरी व मगरी आढळतात. गंगा नदीत घडियाल या एक प्रकारच्या लहान सुसरी आढळतात.

सुसरीच्या (अथवा मगरीच्या) तंगड्या कमकुवत असल्याने ती जमिनीवर रखडतच चालते पण आपल्या दणकट शेपटीच्या साहाय्याने पाण्यात मात्र ती सफाईने झरझर पोहते. नदीच्या किंवा समुद्राच्या काठावर कधीकधी सुसर एखाद्या ओंडक्यासारखी पडून राहते, पण त्याचवेळी ती आपल्या भक्ष्याची टेहळणी करीत असते. एखादा प्राणी जवळपास आला की मग ती आपल्या शेपटीचा जबर फटका मारून त्याला पकडते, तो प्राणी मरेपर्यंत त्याला पाण्यात बुडवून धरते व मग आपल्या तीक्ष्ण दातांनी फाडून त्याचे लचके मटकावते. पाण्यात सुसरीचे बळ एवढे वाढते की एखाद्या मध्यम आकाराच्या हत्तीलासुद्धा ती पाण्यात खेचून ठार करू शकते.

गंमत अशी की कित्येक अणकुचीदार दातांनी भरलेल्या, सुसरीच्या जबड्याला 'झिगझॅग' नावाचे छोटे पाखरू मात्र घाबरत नाही, उलट त्याची आणि सुसरीची दोस्ती असते. हे पाखरू आले की सुसर आपला जबडा उघडा फाकून धरते. मग हे पाखरू तिच्या दातांत अडकून राहिलेले मासांचे लहानसहान तुकडे आपल्या चोचीने उचकटून खाऊन टाकते. एक प्रकारे हे पाखरू सुसरीचे दात कोरण्याचेच काम करते. म्हणजे एकीकडे सुसरीचे दात साफ होतात, तर दुसरीकडे या पाखरांचे पोट भरते. एकूण दोघांच्याही स्वार्थापोटी दोघांची ही 'अजब दोस्ती' जमलेली असते. दातसफाईची ही कामगिरी उरकतानाही त्या पाखरांचे आजूबाजूला बारीक लक्ष असते. सुसरीचा एखादा शत्रू,उदाहरणार्थ माणूस, जर जवळपास येताना दिसला तर ते पाखरू ओरडून सुसरीला धोक्याचा इशारा देते.







# ५. ताकदवान 'ओरँग उटान'

इंडोनेशियातील बोर्निओ – सुमात्रा बेटांवरील जंगलात 'ओरँग उटान' म्हणजेच 'रान माणूस' म्हटला जाणारा वानर सापडतो. साडेचार फूट उंच असलेल्या या वानराच्या पसरलेल्या दोन्ही हातांची मिळून लांबी साडेसात फूट भरते. याच्या हातांची ताकद एवढी जबरदस्त असते, की अर्धा इंच जाडीचा पोलादी पाईप हा रबराच्या नळीसारखा सहज वाकवू शकतो. हा मुख्यतः झाडांवरूनच उड्या मारीत हिंडतो; आणि झोके घेऊन लांबवरच्या झाडावर सफाईने उडी घेतो.

हे वानर ४० ते ६० अशा कुटुंबगटाने टोळी करून राहतात. झाडांच्या मोठाल्या आडव्या फांद्यांवर झोपतात. सर्वांत ताकदवान वानर टोळीप्रमुख बनतो





# ६. महाकाय देवमासा

व्हेल उर्फ देवमासा हा माशासारखा दिसणारा व समुद्रात संचार करणारा एक प्रचंड सस्तन प्राणी आहे. याचा वावर मुख्यतः महासागरातच असतो व सागरात १००० मीटरहून जास्त खोल तो डुबी घेऊ शकतो.


व्हेलचे निळा व्हेल, करडा व्हेल, स्पर्म व्हेल व मारेकरी व्हेल असे प्रकार आहेत. त्यापैकी स्पर्म व मारेकरी व्हेल यांना दात असतात.

या सर्वप्रकारच्या देवमाशांत मोठा असतो तो निळा व्हेल. एकपरी हा जगातला सर्वांत मोठा प्राणी. पकडलेल्या अशा एका देवमाशाची लांबी होती जवळजवळ १०० फूट व वजन होते १७७ टन म्हणजे ३६६ घोड्यांएवढे किंवा ३५ हत्तींएवढे. निळ्या व्हेलला दात नसतात भक्ष्य खाण्याच्या वेळी हा लहानसहान जातींच्या माशांचे थवे दिसले की त्यांच्यासह पाण्याचा लोट आपल्या भल्यामोठ्या जबड्यात लोटतो व मग तोंडातले पाणी बाहेर फेकून देतो. गंमत अशी की पाण्याबरोबर त्याच्या जबड्यात आलेले लहान मासे, त्याच्या टाळूपासून लटकणाऱ्या विशिष्ट हाडांच्या सापळ्यात अडकून राहतात.

मात्र देवमाशाला पाण्यात असताना इतर माशांसारखा श्वासोच्छ्वास करता येत्त नाही. त्यासाठी अधूनमधून त्याला पाण्यावर डोके काढावे लागते. पण काही जातींचे व्हेल सतत तासभर पाण्यात राहू शकतात.

स्पर्म व्हेलचे वैशिष्ट्य असे की याच्या आतड्यात 'ॲम्बरग्रीस' नावाचे काळसर गंधमय द्रव्य असते. स्पर्म व्हेल तो द्रवपदार्थ अधूनमधून थुंकून टाकतो. हा द्रवपदार्थ समुद्राच्या पाण्यावर तवंगासारखा तरंगतो व हवा आणि सूर्यप्रकाशाच्या प्रभावाने फिकट बनतो आणि त्याला एक प्रकारचा मंद सुगंधही येऊ लागतो. काही व्यापारी हा पदार्थ मिळवतात व त्यात इतर पदार्थ मिसळून त्याचे उत्तम सुगंधी अत्तर बनवितात. हे अत्तर बराच काळ टिकणारे असून बहुमोलाने विकले जाते निळा व्हेल ताशी ३५ किलोमीटर वेगाने पोहू शकतो तर करड्या व्हेलचा वेग असतो ताशी १२ किलोमीटर. मारेकरी व्हेल मात्र ताशी ७४ किलोमीटरच्या वेगाने पाणी कापतो.

श्वासोच्छ्वासासाठी देवमाशाच्या पाठीवर एक भोक असते व ते भोक तो उघड-बंद करू शकतो. पाण्याखाली जाताना हे भोक तो बंद करतो व श्वसनासाठी जेव्हा तो पाण्याच्या पृष्ठभागावर येतो तेव्हा याच भोकातून तो प्राणवायू घेतो व उच्छ्वासही सोडतो. त्याने या भोकातून बाहेर सोडलेली हवा इतकी गरम असते की बाहेरील हवेच्या थंडाव्याने तिचे द्रवीभवन होते व पाण्याचा एक फवाराच याच्या पाठीतून उडालेला दिसतो.



## ७. अती वेगवान शीडमासा

पाठीच्या सबंध कण्यावर जहाजाच्या शिडासारखा उंच कातडी पडदा असलेला शीडमासा (सेल फिश) पृथ्वीवरील सर्वात वेगवान प्राणी असावा. तो ताशी ११० किलोमीटर या वेगाने पोहोतो. जमिनीवरील प्राण्यांमध्ये सर्वात वेगवान समजल्या जाणाऱ्या चित्त्याचा धावण्याचा वेग असतो ताशी १०१ किलोमीटर.

## ८. तिरंदाज मासा

हा छोटा मासा नदीत सापडतो. तो जलपृष्ठालगत पोहतो व पाण्यात डोकावणाऱ्या फांद्यांवर एखादा कीटक बसलेला दिसला तर त्याच्या अंगावर चक्क पाण्याची चूळ फेकून त्याला पाण्यात पाडतो व मटकावतो.


तिरंदाज माशाच्या तोंडात वरच्या बाजूला वळ्या असतात. माशाने आपली जीभ वरच्या बाजूला दाबली की, पिस्तुलाच्या गोळीसारखी पाण्याची धार उडते व त्याने घायाळ होऊन किडा खाली पडतो. त्याच्या नेमबाजीमुळे त्याला तिरंदाज मासा हे नाव मिळाले आहे. हा भारत व ऑस्ट्रेलियाचा रहिवासी आहे.

## ९. महाकाय घोरपड


प्रशान्त महासागरातील कॉमोडो बेटावर १० फूट लांबीची भलीमोठी घोरपड आढळते. तिला 'कॉमोडो ड्रॅगन' म्हणतात. जगातली ही सर्वांत मोठी घोरपड होय. या घोरपडीचे वजन दीडशे किलोपर्यंत असते. करवतीसारखे दात असलेली ही राक्षसी घोरपड माकड, लहानसे हरिण असे प्राणी चक्क उचलून नेऊन मारून खाते.

## १०. सर्वांत मोठा बेडूक

जगातला सर्वांत मोठा बेडूक आफ्रिकेत आढळतो. हा बेडूक तीन फूट लांबीचा असून त्याचे वजन भरते सुमारे तीन किलो.



# ११. लांब शेपटीचा वानर



मादागास्करच्या जंगलात लांबच-लांब पांढऱ्या, केसाळ शेपटीवर काळे, वाटोळे आडवे पट्टे पट्टे असलेला लेमूर जातीचा वानर आढळतो. याची शेपटी त्याच्या देहाच्या दुपटीहून जास्त लांब असते. हा झाडावर उड्या मारून नाना कसरती करतो. एका फांदीवरून दुसऱ्या दूरवरच्या फांदीवर हा सहजपणे झेप घेऊ शकतो. उड्या मारताना तोल सांभाळायला याला या लांब शेपटीचा चांगला उपयोग होतो. आणि रात्रीच्या गारव्यात अंगात उब यावी म्हणून हा आपली लांबट, केसाळ शेपटी, मफलरसारखी आपल्या गळ्याभोवती गुंडाळून घेतो. हा वानर चांगला माणसाळतो. म्हणून काही लोक याला घरी पाळतातसुद्धा.

याचा चेहरा, कान व छाती-पोट पांढरीशुभ्र असून हात व पाठ काळी असते.

# १२. विषारी कातडीचे बेडूक


'बाण-विषारी बेडूक' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बेडकाची कातडी एवढी जबर विषारी असते, की – त्याला चावणारा कोणताही पशू त्या विषाने ठार होतो. या विषाच्या एक-लक्षांश ग्रॅमनेसुद्धा माणूस मरू शकतो. दुसऱ्या कोणत्याही प्राण्याचे विष एवढे जालीम नसते. दक्षिण अमेरिकेतले वनवासी रेड इंडियन लोक शिकारीच्या आपल्या हत्यारांची व बाणांची टोके या विषाने माखतात.


# १३. उंदरासारखा छोटुकला वानर

लेमूर जातीचा सर्वांत लहानगा वानर उंदरासारखा पिटुकला असतो. म्हणून त्याला 'उंदीरडा वानर' म्हणतात. याचा देह अवघा पाच इंच लांब असतो. मात्र याचे शेपूट सहा इंच लांब असते. याच्या अंगभर पिंगटपांढरी भरगच्च लोकर असते. हा दिवसा झाडझाडोऱ्यात किंवा झाडाच्या ढोलीत लपून राहतो. त्यावेळी कुणी याच्या शांततेचा भंग केला, तर हा किंचाळून आपला वैताग व्यक्त करतो.

आपले भक्ष्य – कीटक किंवा फळे शोधायला हा रात्रीच्या वेळी बाहेर पडतो. विशेष म्हणजे रात्रीच्या अंधारातही हा न चुकता एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर उडी मारतो.

हा प्राणी सहजासहजी दिसत नाही. तसाच तो सापडणेही मुष्कील असते. पाळण्याएवढा तो माणसाळतही नाही.





# १४. साप का सरडा ?

अमेरिकेच्या दक्षिण व मध्य भागात सापासारखा दिसणारा सडपातळ, लांब सरडा आढळतो. हा सापासारखा दिसत असला व याला 'काच साप' (ग्लास स्नेक) म्हणत असले तरी याच्या डोळ्यांना पापण्या असून कानांची दोन भोकेपण असतात.

इतर सरड्यांप्रमाणे हा सरडा देखील, शत्रूने पकडले असता आपली शेपटी तोडून टाकतो. शत्रूच्या तावडीतून सुटायचा हा त्याचा कावा असतो. तुटलेली शेपटी वळवळत राहते. शत्रूचे लक्ष तिकडे जाते; आणि ती संधी साधून हा पळून सुरक्षित जागी जाऊ शकतो. शिवाय शेपटी तुटल्याने त्याला तशी काही दुखापतही होत नाही. तुटलेली शेपटी बाकीच्या देहाला पुन्हा जुळली जाऊ शकत नाही; पण त्याला नवीन शेपटी यथावकाश उगवते.

# १५. कात टाकणारा सरडा

बटबटीत गोल मोठाले डोळे असलेल्या या सरड्याला अंगभर बटणांसारख्या रंगीत खवल्यांची कातडी असते. पायांवरही वेगळ्या रंगाचे बारीक बारीक खवले असतात. पण त्याची ही कातडी काही दिवसांनी जुनी होऊन सैल होते ती कात तो टाकून देतो.


कात टाकायची वेळ आली म्हणजे स्वारी आपल्या बिळात जाते आणि अंगाची ओढाताण करून अंगावरची सैलावलेली कातडी हिसकावून टाकते. मग त्या कातडीखाली निर्माण झालेली नवीन रंगीत, खवलेवाली कातडी चमकून उठते. गंमत अशी की – काढून टाकलेली कात – जुनी कातडी हा सरडा पुढल्या पंजांनी गुंडाळतो आणि आपल्या तोंडात कोंबतो, पार मटकावून टाकतो. अशाप्रकारे खाद्य म्हणून जुन्या कातीया उपयोग तो करतो.

## १६. आयाळवाला सरडा

ऑस्ट्रेलियात एक भलामोठा सरडा अशा जातीचा आहे, की त्याची मान व गळा यांच्याभोवती चामडीच्या पडद्यांची विलक्षण आयाळ असते. वेळप्रसंगी चामडीची ही झालर तो फुगवतो व शत्रूला घाबरवून सोडतो. फुगवलेल्या आयाळीसहित दिसणारे त्याचे भयानक रूप पाहून शत्रू धूम पळत सुटतो. जिभेच्या एका हाडावाटे या आयाळीच्या पडद्यांचे स्नायू नियंत्रित होतात. तोंड सताड उघडले म्हणजे त्या स्नायूंना चालना मिळते व आयाळीचे पडदे फुगून उठतात. शिवाय त्याच्या पंज्यांना अणकुचीदार वक्र नखे असतात. शत्रूशी लढण्याची पाळी आलीच तर तो नख्यांचा उपयोग करून शत्रूला जायबंदी करतो.

## १७. उडता सरडा


मलायामध्ये, झाडांवर राहणारे उडते सरडे आढळतात. हे सरडे १५ ते १८ इंच लांबीचे असून त्यांची कातडी रंगीबेरंगी असते. हे एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उडत झेप घेतात. धोक्याच्या वेळी हे सरडे आपले अंग चपटे व सपाट बनवतात. त्यावेळी त्यांच्या दोहो बाजूच्या अंगाची कातडी पंखांसारखी पसरते. चपटे, सपाट बनलेले त्यांचे अंग व दोन्ही उपांगांना पसरणारी पंखांसारखी कातडी यामुळे शत्रूला गुंगारा देऊन उडत दुसऱ्या झाडावर किंवा जमिनीवर झेप घेणे सुकर होते.



# १८. सर्वांत मोठे हरिण

उत्तर अमेरिकेत 'मूस' जातीचे वेगळ्या तऱ्हेचे हरिण आढळते. जगातल्या सर्व जातींच्या हरणात हे सर्वांत मोठे, तसेच सर्वांत उंच आहे. 'मूस' नराची उंची खांद्याशी सहा फुटापर्यंत असते. डोके नि शिंग ही त्याहून आणखी वर अडीच एक फुटांची उंची गाठतात. नराचे वजन सुमारे ६५० किलो पर्यंत असते.

याचे दणकट अंग गडद तपकिरी रंगाच्या केसांनी भरलेले असते. पुढील पाय मागच्या पायांहून जास्त उंच असतात. त्यामुळे खांद्यावरच्या पाठीचा भाग पृष्ठभागापेक्षा काहीसा उंच असतो. पुढले पाय लांब असल्याने चरताना याला गुडघे टेकावे लागतात. तसेच पाणी पिण्यासाठीही त्याला नदीत व तळ्यात शिरून पाणी प्यावे लागते. याचे नाक फुगीर असून नाकपुड्याही मोठाल्या असतात. वरचा ओठ मांसल व लोबकळता असतो. याची शिंगे इतर हरणांसारखीच फांदोऱ्यासारखी खोलगट असतात. या शिंगाना तुरळक अशी अंतरा-अंतरावर खिळेरी टोके असतात. तीनएक फूट लांब असणाऱ्या शिंगांचे वजन सुमारे १८ किलो भरते.



# १९. डोंगरी सिंह

अमेरिकेत पोंगर-पर्वतांवर राहणारी सिंहाची एक वेगळीच जात आहे. याला 'पुमा' किंवा 'कॉगर' म्हणतात. याला आयाळ नसते. शेपटी सोडून याची लांबी ४ ते ५ फूट असून शेपूट दोनेक फूट लांब असते. याचे वजन असते ४५ ते ८० किलो. क्वचित काही ९० किलो वजनाचेही असतात.


हा प्राणी झाडावर चढण्यात वाकबगार असून २० फुटांपर्यंत उंचीवर उडी मारू शकतो. तसेच ६० फूट उंचीवरून सहज खाली उडी मारू शकतो.

याचे आवडते खाद्य हरिण हे असले तरी ते न मिळाल्यास हा ससे, उंदीर,भारद्वाज पक्षी खाऊन राहतो.

मादी पुमा दोन ते तीन छाव्यांना जन्म देते. गंमत अशी, की – बाळाच्या अंगावरील लोकरीवर ठिपके असतात; तर शेपटीभोवती पट्टे असतात पण पिल्ले सहा महिन्यांची झाली म्हणजे त्यांच्या अंगावरच्या या खुणा नाहीशा होतात. पिल्ले जन्मल्यावर लगेच आई पिल्लांच्या बापाला हाकलून लावते कारण तो आपलीच बाळे मटकावण्याचा धोका असतो.

या प्राण्यांना १५ वर्षांपर्यंत आयुष्य लाभते.






# २०. काळ्या लेमूर वानराची गोरी मादी

'मॅकॉको' जातीचा 'काळा लेमूर' वानर भरघोस काळ्या केसांचा असतो, पण त्याची मादी मात्र गोरी – पांढऱ्याकरड्या केसांची असते तिच्या चेहऱ्याभोवती छोटी पांढरी आयाळ असते. तिचे फक्त तोंडच काळे असते नर काळ्याभोर केसांचा असल्याने या लेमूराला 'काळा लेमूर' म्हणतात

# २१. सर्वांत मोठे अस्वल


कोडियाक जातीचे अस्वल हे जगातले सर्वांत मोठे; अस्वल होय. खांद्याशी साडेचार फूट उंची असलेल्या या अस्वलाची लांबी तब्बल नऊ फूट असते व वजन असते पाऊण टन. पिवळसर तपकिरी रंगाचे हे प्राणी अलास्का व ब्रिटिश कोलंबिया यांच्या सीमेलगतच्या भागांत राहतात. बहुशः हे गवत व झाडपाला खाऊन राहत असले तरी क्वचित कधीतरी मांसही खातात. मासे, कीटक, रोपट्यांची मुळे व उंदीरही हे खातात. वसंत ऋतूच्या उत्तरार्धात सालमन जातीचे मासे उत्तरेकडच्या नद्यांत शिरतात, अंडी घालतात आणि हजारोंनी मरून पडतात. कोडियाक व इतर जातींची अस्वले या मेलेल्या माशांवर खुशाल ताव मारतात.





# २२. उडती खार


एका जातीची खार चक्क 'उडते' व एका उंच झाडावरून काही अंतरावरच्या दुसऱ्या कमी उंचीच्या झाडावर झेप घेते. या खारीच्या पुढच्या व मागच्या पायांना जोडणारा कातडी पडदा असतो. दोन्ही बाजूंच्या त्या पडद्यांच्या साहाय्याने तिला हे असे उडता येते. पण काही झाले तरी ते पंख नसतात. त्यामुळे हे 'उडणे' अगदी मर्यादित असते. हवाई छत्रीसारखे पायांतले पडदे तिला संथपणे उंचावरून खाली झेप घ्यायला मदत करतात एवढेच.



# २३. अंगाची गुंडाळी करणारा आर्माडिल्लो

चिलखती अंगाचा, पाठीवर सात वळ्या असलेला हा आर्माडिल्लो प्राणी, उत्तर अमेरिकेत आढळतो. नवल असे, की याची मादी नेहमी चौकुळे जन्माला घालते. दुसरे असे की हा प्राणी शत्रू जवळपास आला म्हणजे आपल्या अंगाची चक्क चेंडूसारखी गुंडाळी करून घेतो व उकरलेला मातीच्या बिळात घुसतो. हा प्राणी दिवसा झोपतो व रात्री भक्ष्य मिळवण्यासाठी हिंडतो

पाठीवर तीन किंवा नऊ वंळ्या असलेले देखील या प्राण्याचे प्रकार आहेत



# २४. उडणारा प्राणी 'लॉरिस'

घुबडासारख्या बटबटीत डोळ्यांचा व गोलसर चेहऱ्याचा 'लॉरिस' नावचा प्राणी दक्षिण अमेरिकेतील जंगलात आढळतो. अंगभर दाट करडी लोकर असलेल्या या प्राण्याचा तोंडापासून मानेपर्यंतचा भाग पांढरा असून पायही पांढरट असतात पंजे रुंद व बोटे आखूड तशीच बोथट असतात. याच्या दोन्ही कुशींना, पुढल्या-मागल्या पायांच्यामध्ये सैलसर चामडी असते. तिचा पंखांसारखा उपयोग करून हा प्राणी उडल्यासारखा बऱ्याच लांब अंतरावर झेप घेऊ शकतो.

# २५. स्पंज - एक जलचर प्राणी

आपण जो स्पंज वापरतो ते एका जलचर प्राण्याचे कलेवर असते. या प्राण्याला कणा नसतो, तशीच हाडेही नसतात. हा जिवंतपणी लोकरीच्या चेंडूसारखा गुळगुळीत आणि छिद्रांनी भरलेला असतो अंगभर पसरलेल्या या छिद्रांतून पाणी त्याच्या अंगातून सतत आत-बाहेर येत असते तसे म्हटले तर स्पंज या प्राण्याच्या विविध जाती व आकार असतात. हा प्राणी मेल्यावर त्याचे मऊ लिबलिबीत मांस काढून टाकले जाते. मग उरतो तो आपण वापरतो तो स्पंजाचा सांगाडा. स्पंज हे प्राणी जिवंतपणी उष्ण कटिबंधातील महासागरात तळाशी कशालातरी चिकटून राहतात काही वेळा पाणबुडे ते हस्तगत करतात. उथळ पाण्याच्या तळाशी असले तर कोळी किंवा इतर माणसेही ते पकडतात.

जगभर दरसाल कोट्यवधी रुपये मोलाचे स्पंज गोळा केले जातात. काही ठिकाणी स्पंज प्राण्याचे तुकडे करून 'मत्स्यशेती' करून स्पंजांचे पद्धतशीर उत्पादन केले जाते.



# २६. दुर्मिळ पांडा

'पांढरे अस्वल' म्हणून ओळखला जाणारा पांडा हा प्राणी गोजिरवाणा दिसतो. दिसण्यात अस्वलाशी थोडेसे साम्य असले तरी हा वेगळ्याच जातीचा प्राणी आहे. पूर्ण वाढ झालेल्या प्रौढ पांडाची उंची ६ फुटांपर्यंत वाढते व वजन १५० किलोपर्यंत असते. लहान मुलाने, त्याच्या डोळ्यांत घातलेले काजळ आपल्या बोटांनी चोळून आजूबाजूला बरबटावे तसे पांड्याच्या डोळ्यांभोवती काळेशार ठिपके असतात.

पांडा हा प्राणी दुर्मिळ असून तो केवळ चीनमध्येच आढळतो. पश्चिम चीनमधे पांड्यांच्या वसतिस्थानांचे दहा राखीव भाग आहेत.

शंभर वर्षांपूर्वीपर्यंत पाश्चात्यांना या प्राण्याचे अस्तित्वसुद्धा माहीत नव्हते. चीनमधून पहिला पांडा १९३६ साली अमेरिकेतल्या ब्रूकफील्ड प्राणिसंग्रहालयासाठी पाठवण्यात आला. स्पेनमधल्या माद्रीद येथील प्राणिसंग्रहालयासाठी तर तब्बल १० लाख पौंड देऊन पांडांची जोडी मिळवण्यात आली.

नवलाईची गोष्ट म्हणजे बांबूंच्या बेटांत राहणाऱ्या पांडाचे जन्मतः वजन अवघे १०० ग्रॅम असते. जन्मलेले अर्भक पांढरे, बिनकेसांचे व मिटलेल्या डोळ्यांचे असते. पाऊणएक महिन्याने त्याचे डोळे उघडतात. अंगावरचे पांढरे-काळे केसाळ पट्टे महिन्याभरानंतर उगवतात. बाळ पांडा पहिले ६ महिने आईचे दूध पितो.



# २७. कासवाची विलक्षण कहाणी

जगात कासवाच्या सुमारे २५० जाती आहेत. दलदलीच्या भागात, नदी-समुद्रात तसेच वाळवंटात राहणाऱ्याही कासवांच्या जाती असतात.

चार इंचापासून ते साडेसहा फूट लांबीचे कासव आढळते.

पाण्यात व जमिनीवर राहणाऱ्या कासवाच्या २१ जाती भारतात आहेत. त्यातले हिरव्या रंगाचे कासव ४ फूट लांब व ४०० किलो वजनाचे असते. अंदमान, निकोबार, लक्षद्वीप, रामेश्वर या भागात हिरवी कासवे आढळतात.

चामड्यासारखी पाठ असणारे समुद्री कासव ६ फूट लांबीचे असून त्याचे वजन ४५० किलो असते. समुद्रात राहणारे हे कासव किनाऱ्याकडे सहसा वळत नाही. हे ताशी ३३ किलोमीटर वेगाने पोहते.


कासवे काही न खाता महिनोन् महिने जगू शकतात.

कासवीण एकावेळी तीन तासांत मिळून, १०० ते १५० अंडी घालते. किनाऱ्यावर जिथपर्यंत भरतीच्या लाटा पोचतात, त्यापलीकडल्या वालुकामय भागात ती खड्डा खणते आणि त्यात अंडी घालते. मग त्यावर रेती पसरते. ती अंडी तिला उबवावी लागत नाहीत. उन्हाच्या उष्णतेने वाळू तापते आणि त्या उष्णतेने अंडी आपोआप उबतात. गंमत अशी, की त्या अंड्यांतून कासवीणीची पिल्ले बाहेर पडतात, तेव्हा ती उपजत-बुद्धीने चालत जाऊन समुद्राचे पाणी गाठतात.

पाणकासवे पाणसापांप्रमाणे फक्त अंडी घालण्यासाठी तेवढी जमिनीवर येतात. पाणकासवाचे कवच सपाट असून डोके बरेच फुगू शकते

मोठ्या कासवांचे आयुष्य २०० ते ४०० वर्षांपर्यंतचे असते असे म्हणतात. आपल्याकडे उत्तर भारतात शिवालिक डोंगरभाग आहे. तेथे ६ फूट लांबीचे प्रचंड कासव आढळते.

पाण्यात राहणाऱ्या व जमिनीवर राहणाऱ्या कासवांच्या पायांचे पंजे, त्यांना पाण्यात वा जमिनीवर उपयोगी पडावेत अशा सोयीचे असतात. पाणकासवाला पाण्यात पोहणे सुलभ व्हावे यासाठी त्याचे पाय चपटे, सपाट व स्नायुमय पडदेवजा बनवलेले असतात. तर जमिनीवर राहणाऱ्या कासवाचे पाय खुंटासारखे जाडजूड असतात.



कासवाची चाल मंद असते असे आपण मानतो पण भलेमोठे थोराड कासव जलदगतीने चालते. गियाना व उत्तर ब्राझिलमधील 'माटा-माटा' जातीचे असेच थोराड कासव आपले भक्ष्य पकडायला एवढ्या जलदगतीने धावते, की माणसालाही त्याला गाठणे मुष्कील होते त्याचे वजन **२८० किलोपर्यंत** असते.

निरनिराळ्या जातीच्या लहानमोठ्या कासवांची कवचे वेगवेगळ्या रंगांची, तशीच विविध रंगीत आकृतींनी शोभणारी असतात.


शत्रूपासून, संकटांपासून व पावसावादळापासून आपले रक्षण करायला कासवाला त्याच्या पाठीचे खंबीर, टणक कवच खूप उपयोगी पडते. अशा वेळी ते आपले हातपाय व मानेसह डोके कवचात आखडून घेते.

पाण्यातली कासवे बारीकसारीक मासे, कीटक वगैरे खाऊन राहतात तर जमिनीवरची कासवे भाजीपाला, कोवळे गवत किंवा फळे खाऊन राहतात.

# २८. बिनहाडांचा जेली -फिश


छत्रीसारख्या आकाराच्या लिबलिबीत, बिनहाडांच्या जलचर प्राण्याला जेली फिश म्हणतात. समुद्रात हा इकडून तिकडे फिरतो म्हणून केवळ याला मासा म्हणतात. एरव्ही माशाशी याचे साम्य नाही. बहुतेक सर्व जेली फिश महासागरात राहतात आणि ते चकचकित रंगाचे असतात.

या प्राण्याच्या काही जातींचे आकार छोट्या रोपट्यासारखेही असतात. या जाती काही काळ सागरतळाशी चिकटून राहतात. आणि या काळात रोपट्यासारख्या या प्राण्यांना 'कळे' उगवतात. हे कळे मग अलग होतात आणि स्वतंत्रपणे पाण्यात पोहू शकतात. पण तेसुद्धा काही अवधी गेल्यानंतर पुन्हा सागरतळाशी जाऊन चिकटून राहतात.



# २९. खवले मांजर

अंगभर खवल्यांनी भरलेले, जणू खवल्यांचे चिलखत ल्यालेले हे खवले मांजर. याला पँगोलिन म्हणतात. झाडावर चढून जाणाऱ्या खवल्या मांजराचीही एक अफ्रिकी जात आहे. याची शेपटी खूप लांब तशीच भक्कम व जाडजूड असते. झाडाच्या खोडाला आपली ही शेपटी गुंडाळून घेऊन, त्याच्या आधारावर हे उंच झाडावर चढते आणि झाडावरचे मुंगळे मटकावते.




## ३०. शिंगांच्या दोन जोड्या असणारे डोंगरी हरिण

पर्वतावर राहणारे एका जातीचे असे हरिण आहे, की – ते कड्यांवरून चपळाईने, सहजपणे उड्या मारू शकते. याच्या पायांचे खूर इतके लवचिक, चिवट व खंबीर असतात, की – ते डोंगरकड्यांवरूनही निसटत नाहीत. या डोंगरी हरणाला 'क्लिपस्प्रिंग' म्हणतात.

या हरणाचे दुसरे वैशिष्ट्य असे, की – याच्या डोक्यावर शिंगांच्या दोन जोड्या असतात. दोन छोटीशी टोकदार नि उभट शिंगे प्रत्यक्ष माथ्यावर असतात; तर आखूड पण माणसाच्या हाताच्या पंज्यासारखी विखुरलेली दोन शिंगे दोन कानांच्या मागे असतात. अशा प्रकारची शिंगे दुसऱ्या कोणत्याही हरणांमध्ये आढळत नाही.

## ३१. ध्रुव प्रदेशातील पांढरा कोल्हा

उत्तर ध्रुव प्रदेशात आढळणारा कोल्हा, त्या प्रदेशातल्या बर्फासारखा पांढऱ्या शुभ्र रंगाचा असतो. त्याच्या अंगावर दाट, लांब लोकर असते. त्या प्रदेशातल्या थंड वातावरणापासून ती त्याचे रक्षण करते. याचा आकार मात्र ठेंगणाठुसका, मुंगुसासारखा असून त्याची शेपटीही मुंगुसासारखी झुपकेदार, जाडसर असते. त्याचे कानही अगदी आखूड असतात आणि आखूड पायांची ठेवण बर्फाळ प्रदेशात चालायला उपयोगी पडण्यासारखी असते.




# ३२. विलक्षण प्रवास व मृत्यू

दरसाल नोव्हेंबरात बर्मुडाच्या किनाऱ्यापलीकडच्या समुद्रात चमत्कार घडतो  अटलांटिक महासागरात ८०० फूट खोलीवरच्या थंडगार काळोख्या पाण्यात उत्तर अमेरिकेकडील आणि युरोपकडील ईल मासे जमतात. नर-माद्यांचे मिलन होतं  मग माद्या अंडी घालतात  एक मादी जवळ जवळ दोन कोटी अंडी घालते  आणि नवल असे की, ही अंडी उबून त्यातून पिल्ले बाहेर पडली की त्यांचे आई-बाप दोघेही मरून जातात

ही पारदर्शक चिमुरडी पिल्ले काही दिवस पाण्याच्या पृष्ठभागालगत तरंगत राहतात. मग काही आठवड्यांनी या पिल्लांना ईल माशाचा आकार लाभतो  लहानशा सापासारखे लांब पण चपटे असणारे हे ईल मासे तीन फूट लांबीचे बनतात. पुन्हा नवल असे घडते की, अमेरिकी ईल माशाची पोरे उपजतबुद्धीने पोहत उत्तरेला अमेरिकेच्या किनाऱ्यापाशीच जातात, तर युरोपच्या ईल माशांची पोरे युरोपपर्यंतचा लांब प्रवास पत्करतात

अमेरिकी ईल मासे वर्षभराचे झाल्यावर मेन व फ्लॉरिडा यांच्या दरम्यानच्या अमेरिकी नद्यांत शिरून आतवर पोहत जातात. युरोपीय ईल मासे मात्र तीन वर्षांचे होईपर्यंत नदीच्या ताज्या पाण्यात जात नाहीत. माद्या भक्ष्य मिळविण्यासाठी नद्यांतून एक मैल आतवर पोहत जातात. नर मात्र बहुधा समुद्रकिनाऱ्यालगतच्या वा नद्यांच्या मुखालगतच्या पाण्यात राहून दिवस काढतात. अशा प्रकारे दहा वर्षांचे होईपर्यंतचा काळ हे मासे घालवतात.


त्यानंतर ऑक्टोबरच्या थंडीच्या गारव्यात काहीतरी विलक्षण नैसर्गिक प्रेरणा प्रौढ ईल माशांना अटलांटिक महासागराच्या खोल पाण्यात खेचून आणते  ईल माद्याही नद्यांतून झपाट्याने पोहत तिथे येऊन दाखल होतात. बऱ्याच वेळा नद्यांच्या मुखाशी एवढी वर्षे राहत असलेल्या नरांना माद्या नदीतून येऊन मिळतात आणि एकत्र जमलेल्या या असंख्य नर-माद्या अटलांटिक महासागरातल्या आपल्या जन्मस्थळाशी येऊन थडकतात. आणि बर्मुडाच्या किनाऱ्याजवळच्या खोल पाण्यात त्या नर माद्यांचे मिलन होते. अर्थात मग माद्यांनी अंडी घातल्यानंतर त्यातून पिल्ले बाहेर पडताच नर माद्यांच्या या सगळ्या जोड्या मरण पावतात




# ३३. राक्षसी स्क्वीड मासा

समुद्रात सापणाऱ्या राक्षसी स्क्वीड माशाला लांब नांग्या असून त्यांच्यासह त्याची लांबी तब्बल ४० फुटांपर्यंत असते.

शत्रू हल्ला करायला आला, तर स्क्वीड मासा शाईसारखे पातळ द्रव आपल्याभोवती सोडून शत्रूचा गोंधळ उडवून देतो. तसेच आपल्या अवयवांनी पाण्याचा लोट मागे सारून जोरात पुढे मुसंडी मारतो.





# ३४. माशांची सामुदायिक आत्महत्या

एखादे दिवशी अचानक डॉल्फिन व व्हेल हे समुद्रातील जलचर प्राणी बहुसंख्येने किनाऱ्यावरील वाळूवर झेप घेऊन तडफडत मरतात. तडफडण्याच्या अवस्थेत त्यांना समुद्रात फेकले, तरीसुद्धा ते पुन्हा किनाऱ्यावरील वाळूवर येऊन पडतात व तिथेच मरून जातात. एकदा युरोपातील एका किनाऱ्यावर असे शेकडो मासे मरून पडलेले आढळले.

हे मासे अशा तऱ्हेने सामुदायिक आत्महत्या का करतात या निसर्गाने माणसाला घातलेल्या कोड्याचे उत्तर अजून सापडलेले नाही.

# ३५. पशु-पक्ष्यांचे प्रचंड कळप

काही पशू व पक्षी प्रचंड कळपांनी एकत्र राहतात, असे आढळून आले आहे. एके काळी नैऋत्य अफ्रिकेत लक्षावधी हरणे अशा प्रचंड कळपात राहत होती. हिंस्त्र पशूंपासून आपल्या जमातीचे रक्षण करण्यासाठी बहुसंख्यांनी एकजुटीने राहायचे, हा हेतू त्यामागे असतो. कारण सिंह वा वाघ आपले भक्ष्य हरिण मिळवण्यासाठी हरणांच्या मोठ्या कळपावर हल्ला करण्याचे धाडस करत नाहीत. चुकलेले, एकांडे हरिण बघूनच त्याच्यावर हे हिंस्त्र प्राणी हल्ला करतात. म्हणूनच हरिणांसारखे गरीब प्राणी प्रवास करणे किंवा चरणे अशा गोष्टी एकजुटीने राहून करतात.


माथ्यावर बाशिंग बांधल्यासारखी शिंगे असलेले 'कस्तुरी-बैल' देखील कळपांनी राहतात – वावरतात. अंगाने बळकट असणाऱ्या या बैलाचे वजन ६५० किलोपर्यंत असते. या प्राण्यांना मुख्य भय असते ते लांडग्यांचे. कळपांनी राहिल्यामुळे लांडगे त्यांच्यावर किंवा त्यांच्या पोरांवर हल्ला करू धजत नाहीत. लांडगे दुरून येताना दिसले तर, आपल्या पोरांना मध्यभागी ठेवून, पोरांभोवती कडे करून हे कस्तुरी-बैल वावरतात. लांडग्यांचा कळप आला तरी कळपाचे म्होरके बैल पुढे सरसावून लांडग्यांचा समाचार घेतात.

कस्तुरी-बैलाचा कस्तुरीशी कसलाच संबंध नसतो. तसा हा मेंढीवर्गातीलच प्राणी. अंगभर भरपूर लांब लोकर असलेला. लोकर कापल्यावर पुन्हा वर्षभरात वाढते.

अमेरिकेतल्या टेक्सास राज्यातील मोठमोठाल्या गुहांमध्ये तर कोट्यवधी वटवाघळे झुंडीने राहतात.


स्टर्लिंग पक्षी स्थलांतर करतात तेव्हा हजारोंच्या संख्येने त्यांचे थवे आकाशातून उड्डाण करताना दिसतात. तसेच 'ॲन्कोव्हेटास' नावाचे मासे पेरूजवळच्या समुद्रातून हजारोंच्या संख्येतील थव्यांनी स्थलांतर करतात.


आपल्या भक्ष्याची शिकार साधण्यासाठी लांडगे, तरस किंवा रानकुत्रे कळपांनी वावरतात. हरिण, झेब्रा अशा मोठाल्या प्राण्यांना एकांडे गाठून ठार मारतात. कळपातून अलग पडलेल्या अशा एकांड्या हरणाचा किंवा झेब्र्याचा ते पाठलाग करतात. त्या प्राण्याला खूप धावायला लावून त्याची दमछाक करतात. आणि मग एकजुटीने त्या प्राण्यावर हल्ला करून त्याला ठार मारतात.



# ३६. हिवाळाभर झोपणारे प्राणी

काही प्राणी हिवाळाभर सुरक्षित जागी झोपून राहतात. थंड प्रदेशातील साप-सरडे, कासवे वगैरे सरपटणारे प्राणी हिवाळ्यात उघड्यावर राहिले तर सुस्त बनतात. शिवाय ते थंड प्रकृतीचे असल्याने गारठून मरण्याचा धोका असतो. म्हणून ते सुरक्षित स्थळी बिळांमध्ये वगैरे झोपी जातात. उष्ण रक्ताचे रानउंदीर, खारी, डुकरे, अस्वले असे प्राणी, हिवाळ्यात बर्फाळ बनलेल्या टापूत अन्न मिळणे मुष्कील होत असल्याने तेवढा काळ आपल्या घरात झोप काढतात. मात्र झोपी जाण्यापूर्वी ते भरपूर खाऊन घेतात व लठ्ठ बनतात. त्यामुळे त्यांच्या अंगावर जादा चरबी चढते. ती झोपेच्या काळात कामी येते. मग हिवाळ्याअखेर ते अंगलटीने पुन्हा पूर्वीसारखे बनतात. खार, कवचाची फळे कुठेतरी गुप्त जागी लपवून ठेवते. म्हणजे हिवाळ्यातल्या एखाद्या उबदार दिवशी तिला जाग आली तरी ती फळे तिला खाता येतात.





# ३७. पोहणारी घोरपड

प्रशान्त महासागरातील गॅलिपॅगॉस बेटांवर 'इग्वाना' म्हणून ओळखली जाणारी विलक्षण घोरपड आहे. यापैकी एका जातीच्या घोरपडी फक्त भूचर असून दुसऱ्या जातीच्या जलचरही आहेत. समुद्रात पोहणाऱ्या घोरपडी या बेटांखेरीज जगात दुसरीकडे कुठेही आढळत नाहीत. यांच्या पाठीवर ज्वालामुखीच्या शंकूसारखे दिसणारे खवले असतात.

या घोरपडीची शेपटी तिच्या देहाच्या जवळजवळ दुप्पट लांब व टोकाशी निमुळती होत गेलेली असते. तर पंज्यांची नखे मोठाली, आकडीसारखी, टोकदार असतात. झाडाच्या फांदीवर उन्हात पडून राहाणे तिला आवडते. अशी ती तासचे तास ऊन खात राहते.

या घोरपडी शाकाहारी असतात. खेकडे, त्यांच्या पाठीवरच्या चामडीच्या वळ्यांत लपून राहणारे कीटक, उचकटून खातात त्यांच्याकडेही या कानाडोळा करतात. समुद्रकाठावरची लव्हाळी हे यांचे नेहमीचे भक्ष्य.

जलचर घोरपडी कधीकधी समुद्रात पोहत असल्या तरी शार्क माशांच्या भीतीने त्या वारंवार किनारा गाठतात. किनाऱ्यावरच त्यांना सुरक्षितता वाटते

जमिनीवर राहणारी इग्वाना घोरपडही शाकाहारी असून वनस्पतीचा पाला खाऊन जगते. ही फार आळशी असून अधूनमधून, 'अकॅशिया' नावाच्या झाडावर चढून, पाने खाऊन फांदीवर पडून राहते. ही बीळ खोदून त्यातही राहते.


# ३८. समुद्रात पोहणारा विचित्र वानर

प्रॉबॉसिस नावाचा एका जातीचा वानर जगात फक्त बोर्निओच्या जंगलात आढळतो. याच्या चेहऱ्याचा वरचा भाग चक्क म्हाताऱ्या माणसासारखा दिसतो. याचे तोंड लांबट असते, तर नाक जाडजूड व लांबट असून ते ओठांवर ओथंबलेले असते. हे नाक ६ ते ७ इंचांपर्यंत लांब असते. डोके अगदी सपाट, चपटी टोपी (स्कलकॅप) घातल्यासारखे दिसते. दोन्ही कानांपासून हनुवटीपर्यंत याला, वाढलेल्या दाढीसारखे लांब केस असतात.

त्याचा गळा व मान यांच्याभोवती पांढरा मफलर गुंडाळल्यासारखी, कोटाच्या कॉलरीसारखी केसाळ 'आयाळ' असते म्हणूनच, दूरवरून पाहिले तर, फुगीर पोटाचा लठ्ठ पण ठेंगणाठुसका शुभ्र दाढीवाला म्हातारा माणूस, पांढरा मफलर गुंडाळून बसलेला असावा, तसा हा दिसतो. विशेष म्हणजे हा वानर समुद्रात मैलोन्-मैल पोहून जातो.

# ३९. अफाट तोंड फाकवणारे मासे

'ब्लॅक गल्पर' (गट्ट्म करणारा काळा मासा) व 'स्वॅलोअर' (गिळंकृत करणारा मासा) यांना आपले पोट फुगवून तोंड एवढे फाकवता येते की – त्यांच्या तिप्पट मोठ्या आकाराचा मासा त्यांना तोंडात पकडून गिळता येतो.




# ४०. अद्‌भुत अँगलर मासा

बाकदार सुळ्यांचे टोकदार दात असलेल्या या 'अँगलर' माशाचा संचार खोलखोल समुद्रात असतो. याच्या अंगात असे काही रसायन असते, की – याच्या अंगातून प्रकाशाचे किरण सगळीकडे फाकतात.

या माशाची अद्‌भुत गोष्ट अशी, की – या माशाच्या जातीचा नर अगदी चिमुकला असतो व त्याच्याहून कित्येक पटींनी मोठ्या असलेल्या मादीला घट्ट चिकटून असतो; आयुष्यभर तो तसाच जगतो.

अँगलर मासे आपल्या अंगातील प्रकाशकिरणांनी भक्ष्याला आकर्षून घेतात. यांना प्रकाशकिरणांची उघडझापही करता येते.



# ४१. समुद्रकाकडीचे अद्‌भुत शरीर

काकडीसारखा दिसणारा एक जलचर प्राणी असतो. त्याला म्हणतात 'समुद्रकाकडी'. हा समुद्रकाकडी प्राणी जाडसर किड्यासारखा असतो. किनाऱ्यावरील वाळूत बीळ पाडूनही हा प्राणी कधीकधी राहतो. या प्राण्याला त्याच्या एका टोकाच्या भोवताली पोकळ नळीसारखे पण बारीक बारीक पाय असंतात. हेच पाय अन्न खेचून ते या प्राण्याच्या पोटात घालतात.


या प्राण्याची एक अद्‌भुत गोष्ट अशी आहे, की एखाद्या प्राण्याने याच्या अंगावर हल्ला केला, तर हा आपले डोके झटकून, आपला देह, डोक्यापासून अलग फेकून देतो. याच्या शाबूत राहिलेल्या डोक्याला मागाहून आपोआप पुन्हा देह उगवतो. म्हणजेच पुन्हा तो पूर्ण प्राणी बनतो.


# ४२. तळ्यात झोपडे बांधणारी घूस

काटक्या, पालापाचोळा व चिखल वापरून चक्क तळ्यात झोपडेवजा घरकुल बांधणारी एका जातीची केसाळ घूस असते. या घरकुलाच्या पोटात मध्यभागी उंचावर एक चोरकप्पा बनवून त्यात ती पोरांसह राहते. हेच तिचे सुरक्षित घरटे.

# पक्षिजगत

अंडे फुटून पक्ष्यांचा जन्म होतो. पणे हे अंडे आपोआप फुटत नाही तर पिल्लाला आतून ताकद लावून हे अंडे फोडावे लागते. या कामासाठी निसर्गाने पिल्लाच्या चोचीच्या पुढच्या बाजूस एक टणक भाग दिलेला असतो, ज्याला 'अंड्याचा दात म्हणतात. अंडे फोडून बाहेर येण्याचे काम झाल्यावर काही दिवसांनी तो नाहिसा होतो.






## ४३. दगडांनी अंडे फोडणारे गिधाड


इजिप्तमधील गिधाड अत्यंत टणक कवच असलेले शहामृगाचे अंडे मोठ्या युक्तीने फोडते. तोंडात एक दगड पकडून तो अंड्यावर फेकते व अंडे फुटल्यावर आतला बलक मटकावून टाकते.

गाणारा एक रानपक्षी गोगलगाईला दगडावर आपटून तिचे कवच फोडतो व मग तिचा फडशा पाडतो.



## ४४. भैरवीचे सूर आळवणारा पक्षी

कालकूट नावाचा गाणारा पक्षी आहे. त्याचे वैशिष्ट्य हे, की तो केवळ भैरवी रागाचे सूर आळवतो. आणि ते सुद्धा पहाटेच्या शांत समयाला.



## ४५. सर्वांत मोठा समुद्रपक्षी

अल्बॅट्रॉस हा सर्वांत मोठा समुद्रपक्षी असून तो आपला बराचसा वेळ महासागरावर उड्डाण करून घालवतो. या पक्ष्याच्या तंगड्या आखूड असतात व पंख अरुंद पण खूप लांब असतात. याच्या पसरलेल्या पंखांची लांबी तब्बल बारा फुटांपर्यंत असते. एवढे लांब पंख असलेला दुसरा पक्षी पृथ्वीवर नाही.

हा पक्षी पंख न फडफडवता, संथपणे तासचे तास सागरावर, हवेत तरंगत राहू शकतो. हा पक्षी ३० वर्षांपर्यंत जगतो.

## ४६. उपकारक समुद्रपक्षी

समुद्रपक्षी ताशी ८० किलोमीटर वेगाने उडू शकतो, व आभाळात तासचे तास तरंगत राहू शकतो.

समुद्रपक्षी खारे पाणी पितो खरा; पण तो ते तसेच गिळत नाही. त्याच्या डोक्याजवळील विशिष्ट ग्रंथीच्या साहाय्याने त्या पाण्यातला खारट अंश वेगळा केला जातो व तो चोचीवाटे बाहेर घालवला जातो. अर्थातच उरलेले गोड पाणी हा पक्षी प्रत्यक्षात गिळतो.

समुद्र किनाऱ्यालगत लाटांवर तरंगत, मागेपुढे सरकत समुद्रपक्षी मासे वा खेकडे शिताफीने पकडतो.

समुद्रपक्षी किनारपट्टी व बागा स्वच्छ करतात. शिवाय किनाऱ्यावरील कुरणे, शेते त्यांच्या विष्ठेने सुपीक बनतात.

## ४७. समुद्रपक्ष्यांच्या अफाट वसाहती

काही समुद्रपक्ष्यांच्या वसाहती अफाट असतात. ग्रीनलंडमधील गिलेमॉटस जातीच्या समुद्रपक्ष्यांची वसाहत एवढी प्रचंड असते, की – या वसाहतीत वीसेक लाख तरी पक्षी राहतात. हे एवढे पक्षी एकमेकांच्या जवळ घरटी बांधून राहतात. आणि या सगळ्यांना समुद्रातले मासे भरपूर खायला मिळतात.


# ४८. पक्ष्यांचे स्मारक


समुद्रपक्षी पिकांवरचे असंख्य कीटक खाऊन फस्त करतात. त्यामुळे हजारो एकरांतील पिके वाचतात.

१८४८ सालातली गोष्ट . अमेरिकेतील सॉल्ट लेक सिटीमध्ये येऊन स्थायिक झालेल्या वसाहतवाल्यांवर पीकनासाडीची आपत्ती ओढवली होती. त्यांच्या पिकांवर आणि वनस्पतींवर असंख्य रातकिड्यांची धाड आली होती. पिके नष्ट झाली असती, तर त्या लोकांवर उपासमारीची पाळी आली असती. पण समुद्रपक्ष्यांचे थवेच्या थवे त्यांच्या मदतीला धावून आले. या पक्ष्यांनी हा – हा म्हणता या कीटकांचा फडशा पाडला त्यामुळे पीक वाचले आणि अर्थातच लोकांची उपासमार टळली. या घटनेची आठवण करून देणारे एक सुंदर स्मारक त्या शहरात उभारण्यात आलेले आहे.

# ४९. थक्क करणारे अखंड उड्डाण

जमिनीवरच्या दुसऱ्या कोणत्याही पक्ष्यांपेक्षा ग्रीनलंडचे 'व्हीटीअर्स' नावाचे पक्षी, स्थलांतर करताना अधिक लांबवर असे अखंड (न थांबता) उड्डाण करतात. हे पक्षी तसे छोटेसेच असतात. पण ग्रीनलंडपासून स्पेनपर्यंतचा ३,००० किलोमीटरचा प्रवास हे पक्षी अखंड उड्डाण करून करतात





# ५०. प्रचंड बहुरंगी पोपट


जगात पोपटाच्या तब्बल ३२५ जाती आहेत. त्यांच्यातला आकाराने सर्वांत मोठा, तसाच लखलखीत रंगाचा अन् विलक्षण आकर्षक असा आहे 'मॅकॉ' जातीचा पोपट. मध्य व दक्षिण अमेरिकेच्या उष्ण कटिबंधांतील अरण्यात हा सापडतो. शेपटी धरून हा जवळ जवळ मीटरभर लांब असतो (सुमारे सव्वातीन फूट). पिवळ्या, निळ्या, हिरव्या, तांबड्या व काळ्या रंगांच्या पिसांनी खुलून दिसणारी याची डौलदार छबी गालांवरच्या पांढऱ्या ठिपक्यांनी कशी उठून दिसते! बाकदार आणि टोकदार असलेली याची चोच लांब व टणक असते. झाडावर चढून व फांद्या घट्ट पकडून बसायला उपकारक ठरणारी अशी याच्या पायांची नखे असतात – पुढे दोन नि पाठीमागे दोन अशा रचनेची

रंगीबेरंगी पिसांच्या मॅकॉखेरीज फक्त निळसर-जांभळे, तसेच फक्त पिवळसर पंख असलेले मॅकॉही असतात.

मॅकॉ पोपटांना खेळायला आवडते. लहान लहान दगडांशीही ते खेळतात. शिकवलेले बोलण्यात तर ते पटाईत असतातच, शिवाय प्राणिसंग्रहालयात ठेवले असता, वारंवार कानांवर पडलेले इतर प्राण्यांचे आवाजही ते हुबेहूब काढून दाखवतात

आपल्याकडे भारतात पोपटांच्या चार जाती आहेत. त्यातल्या तीन जातींमध्ये फक्त हिरव्या रंगाचेच पोपट आढळतात. चौथी जात थोड्याशा निळसर पंखांची आहे.

# ५१. वेडावणारे पक्षी



दयाळ, मॅकॉ व काही प्रकारचे कावळे हे वेडावून दाखवणारे पक्षी आहेत. एका घरात दोन दयाळ पक्षी पाळले होते. त्या घरातली मोलकरीण कोंबड्यांना खाद्य घालण्यासाठी विशिष्ट आवाज काढून त्यांना बोलावी. हे दयाळ तिचे अनुकरण करून तिच्यासारखा आवाज काढायचे; व कोंबड्यांना चकवायचे. कारण तसे आवाज काढून ती मोलकरीणच आपल्याला बोलावतेय, असा कोंबड्यांचा समज व्हायचा, आणि त्या फसायच्या. कोंबड्या चकल्याचे पाहून हे बिलंदर दयाळ मग वेडावणारे स्वर काढायचे. हे पक्षी इतर पाखरांची गाणी व सुतारपक्ष्याची हाकही हुबेहूब वठवीत.

पिवळ्या डोक्याच्या सारिका तर बारीक शीळ घालणे, तसेच चुचकारण्याचा व खोकल्याचा आवाज करणे या कामी तरबेज असतात. बोलण्याची नक्कलही त्या स्पष्टपणे करतात.

अमेरिकेत अशा वेडावणाऱ्या पक्ष्यांच्या ३१ जाती आढळल्या आहेत. वेडावणाऱ्या अशाच एका पक्ष्याने, स्वतःचा गाण्याच्या भरीला आणखी तीस इतर गाण्यांचे मिश्रण केलेले आढळले. फ्लोरिडातील काही वेडावणाऱ्या पक्ष्यांनी युरोपमधून आणलेल्या पिंजऱ्यातल्या बुलबुलांच्या गाण्याची नक्कल केलेली आढळली.

पोस्टमन शीळ घालतो तिची नक्कलही अशाच एका पक्ष्याने केलेली आढळली.




# ५२. सर्वांत वेगवान पक्षी

पांगोळी (स्विफ्ट) जातीचा, करवती शेपटीचा आशियाई पक्षी सर्वांत वेगवान पक्षी असल्याचे आढळून आले आहे. उडताना टिकावासारखा दिसणारा हा पक्षी ताशी दोनेकशे किलोमीटर वेगाने उडतो. यापेक्षा जास्त वेगानेही तो उडतो, असे काही पक्षीनिरीक्षकांचे म्हणणे आहे.

# ५३. पिसारावाले कबुतर

बहुतेक कबुतरांना १२ शेपूट-पिसे असतात. पण एका दुर्मिळ कबुतराला पिसारा फुलवण्याएवढी, पंख्यासारखी, तब्बल ४८ पिसे असतात. मोराची आठवण करुन देणारा हा पिसारा फुलवल्यावर या कबुतराची शान काही औरच दिसते.



# ५४. ।। घुबडपुराण ।।

वस्तऱ्यासारखी धारदार लांब नखे, सपाट चेहऱ्यावर भयानक, मोठाले बटबटीत डोळे असलेल्या घुबडाला हवेत कसरती करीत झरझर उडण्याचे कसब साधलेले असते. घुबडाची नजर माणसाच्या ५० ते १०० पटींने तीक्ष्ण असते तर त्याच्या मोठाल्या कानांची श्रवणशक्ती माणसाच्या दसपट तीव्र असते.

मऊ, लवचिक पिसांमुळे आवाज होऊ न देता त्याला उडता येते. दर सेकंदाला बाराएक फूट लांब उडण्याची त्याची गती असल्याने केवळ अर्ध्या सेकंदात ते आपले भक्ष्य (छोटी पाखरे, उंदीर, मासे वगैरे) पकडू शकते. भक्ष्य ते जसेच्या तसे गट्ट करून टाकते. जरूर पडली तरच आपल्या बाकदार, टोकेरी चोचीने भक्ष्य फाडून खाते.


मादी आपले एकेक पांढरे अंडे आठवड्याभरात उबवते. नर-मादी जोडीदार जवळजवळ जन्मभर एकोप्याने राहतात.

दक्षिण ध्रुवाचा प्रदेश सोडून जगाच्या इतर सर्व भागात मिळून घुबडाच्या १३४ जाती आढळतात. उत्तर अमेरिकेत आढळणारे १३ सेंटिमीटर लांबीचे घुबड सर्वांत लहान आकाराचे असून युरोपात आढळणारे ६० सेंटिमीटर लांबीचे 'गरुड घुबड' सर्वांत मोठ्या आकाराचे आहे. शिंगांसारखे उंच पिसांचे झुपके असलेल्या घुबडाला 'शिंगाडे घुबड' म्हणतात. हे घुबड अतिशय भयानक दिसते. ते मांजरासारखा म्यॅंव व कुत्र्यासारखा भुकण्याचा आवाज काढते. मात्र हे माणसाला अपाय करीत नाही. उलट, ते उंदीर-घुशी पकडून खात असल्याने शेतकऱ्यांना उपकारकच ठरते.

# ५५. घाबरविणारा 'रातवा'

झाडाच्या फांदीवरच झोपणाऱ्या 'रातवा' पक्ष्याचा रंग झाडाच्या सालीशी मिळताजुळता तर असतोच, शिवाय तो फांदीला पोट टेकून फांदीशी समांतर बसत असल्यामुळे 'रातवा' झाडाच्या फांदीचाच एक भाग बनून जातो त्याच्या जवळ गेले तरी तो उडत नाही, फक्त डोळे किलकिले करून पाहत राहतो.

रातव्याची पिल्ले तर आणखी एक गंमत करतात. माणूस किंवा इतर कोणी शत्रू पिल्लाजवळ आला की पिल्लू थिजते, डोळे किलकिले करून अंग चोरून बसते. शत्रू आणखी जवळ आला की उडण्याचा प्रयत्न करते. पण उडण्याची ताकद अद्याप पिल्लामध्ये आली नसेल तर ते आपले अंग फुगवते, पखांवरील पीस अन् पीस फुलारुन व पंख पसरून आपण मोठे भयानक प्राणी आहोत असा आभास निर्माण करुन शत्रूला घाबरविण्याचा प्रयत्न करते



## ५६. हिवाळ्यात लपून बसणारा पक्षी


उत्तर अमेरिकेतील 'पूअरविल' नावाचा पक्षी हिवाळ्यात एखाद्या खडकाच्या फटीत लपून बसून, झोपूनच थंडीचे दिवस काढतो. या दिवसांत त्याच्या अंगातली ऊर्जा, नेहमीपेक्षा तीस टक्क्यांहून कमी गतीने ओसरते. त्यामुळे या पक्ष्याला हिवाळ्याचे दिवस अन्न-पाण्याविना सुखरूपपणे निभावून नेता येतात. त्याचा श्वासोच्छ्वास पण अगदी मंदपणे चालू राहतो.

## ५७. मुंग्या अंगावर घेणारी पाखरे

कित्येक पाखरे मुंग्या चिरडून आपल्या चोचीने आपल्या पंखांवर ठेवतात. कारण मुंग्या फॉर्मिक ॲसिड नावाचे रसायन निर्माण करतात. ते पंखांत गेले म्हणजे, पंखांत शिरून बसलेले बारीक उपद्रवी कीटक आपोआप मरून जातात, असा या पाखरांचा अनुभव आहे.

## ५८. खोलवर बुडी मारणारा पक्षी

जलबुड्या (डायव्हर) हा जलपक्षी पाण्यात खोलवर – तब्बल अडीचशे फूट सूर मारू शकतो.



## ५९. पंखांची काळजी

जमिनीवरचे पक्षी पाण्याच्या डबक्यात किंवा मातीत आपले पंख फडफडवून, एक प्रकारे आंघोळ करतात. तर जलपक्षी पाण्यात डुबी घेऊन आपले पंख धुवून काढतात.

आंघोळीचा हा कार्यक्रम उरकला म्हणजे हे पक्षी, आपल्या चोचीने आपले पंख विंचरून ठीकठाक करतात.

अशी आहे पंख स्वच्छ करण्याची पाखरांची रीत. पण पंखांची अशी निगा राखली तरी त्यांचे पंख वर्षातून एकदा तरी गळून पडतातच अर्थात जुन्या गळून गेलेल्या पंखांच्या जागी नवीन पंख उगवतात. साधारणपणे हिवाळ्यापूर्वी त्यांचे पंख गळून पडतात. आणि थंडीचा गारठा सुरू होण्यापूर्वी त्यांना नवीन पंख उगवलेले असतात. त्यामुळं थंडीत त्यांना उबदार राहता येते.

# ६०. एव्हरेस्टवीर कावळा


एका जातीचा, टोकदार चोचीचा कावळा एव्हरेस्ट या जगातल्या सर्वांत उंच पर्वतशिखरावर अधूनमधून आढळतो.

गरूड व या कावळ्यासारखे पक्षी एवढ्या उंचीवरच्या विरळ हवेत संचार करू शकतात, कारण त्यांची श्वासोच्छ्‌वासाची विशिष्ट पद्धत आहे. आपल्या फुफ्फुसांप्रमाणेच आपल्या पोकळ हाडांतही ते हवा धरून ठेवू शकतात. दुसरे असे, की पक्ष्याचे हृदय त्याच्या अंगभर वेगाने रक्त पोचवते. शिवाय पक्ष्याची पिसे, गार वाऱ्यापासून त्याला वाचवून उबदार ठेवतात. याखेरीज कावळा व गरुड यांचे गडद रंग, एवढ्या उंचीवरच्या प्रखर सूर्यकिरणांपासून त्यांचे रक्षण करतात.



# ६१. शहामृगाचा अमेरिकी भाईबंद – ऱ्हिया

ऱ्हिया हा अमेरिकेतील सर्वांत मोठा पक्षी. पण जगातला सर्वांत मोठा पक्षी शहामृग याच्याहून ऱ्हिया कितीतरी लहान असतो. याच्यापेक्षा शहामृग सहा पटींनी अधिक वजनदार असतो.




मात्र ऱ्हिया हा शहामृगाचा अमेरिकी भाईबंद म्हणता येईल. शहामृगासारखीच ऱ्हियाची मान पिसांनी भरलेली असते. शहामृगासारखेच ऱ्हिया पक्षी उघड्या गवताळ माळावर कळपांनी फिरतात. दक्षिण अमेरिकेच्या दक्षिण भागातील गवताळ माळांवर ऱ्हिया पक्षी राहतात.

प्रत्येक ऱ्हिया नराच्या पाच ते सहा माद्या असतात. या माद्या जी अंडी घालतात ती उबवतात मात्र नर. घरट्यात ५० पासून १५० पर्यंत अंडी आढळतात.

ऱ्हिया माणसापेक्षा कमी उंचीचा व कमी वजनाचा असतो हे खरे. पण धावण्यात तो घोड्यालाही मागे टाकतो. शहामृगासारखाच हा शत्रूला तंगडीचा सणसणीत फटका मारतो.


## ६२. शिरस्त्राणधारी कॅसोवरी



उत्तर ऑस्ट्रेलिया व न्यूगिनी या प्रदेशांत आढळणारा 'कॅसोवरी' नावाचा पक्षी एमू या पक्ष्यासारखा दिसतो. एमूपेक्षा याचे पाय आखूड असून याचा आकारही एमूपेक्षा लहान असतो. याची मान व डोके चकचकीत असतात. याच्या डोक्याच्या पुढच्या भागावर टोपीसारखे हाडामांसाचे शिरस्त्राण असते. मुसंडी मारून जंगलातल्या दाट झाडाझुडपांतून वाट काढायला ते त्याला उपयोगी पडते.


कॅसोवरीच्या तंगड्या व टाचा एवढ्या टणक असतात, की तो संतापला तर माणसाला जबरदस्त फटका मारू शकतो. त्याच्या तंगडीच्या आतल्या बोटाला भाल्यासारखी टोकदार नखी असते तिने तो माणसाला ठारही मारू शकतो.

## ६३. किवीची चलाखी



न्यूझीलंडमध्ये आढळणारा, काळ्या पिसांचा किवी पक्षी आखूड पंख व जड शरीर यामुळे उडू शकत नाही. भक्ष्याला चकवून चलाखीने हा आपले भक्ष्य मटकावतो. चालता-चालता हा असा काही आवाज काढतो, की जणू काय मोठा पाऊस कोसळतोय हा आवाज ऐकून किडे-मकोडे आदी जमिनीतले जीवजंतू बाहेर येतात. ते या बेट्याला आयते खायला मिळतात

मोठाल्या, उंच पायांच्या कोंबडीसारख्या दिसणाऱ्या या पक्ष्याची मादी जी अंडी घालते, ती नर उबवतो व सांभाळतो. आकाराच्या मानाने मादी मोठे अंडे घालते



# ६४. उडू शकणारा सर्वांत जड पक्षी

'कोरी बस्टार्ड' हा पक्षी माणसाच्या खांद्यांइतका उंच असतो. तसे५ त्याचे वजन पाच वर्षांच्या मुलाएवढे असते. शहामृग हा पक्षी याच्याहून मोठा असतो पण तो उडू शकत नाही. उलट, कोरी बस्टार्ड उडू शकतो. म्हणजेच उडू शकणारा हा सर्वांत वजनदार असा पक्षी आहे.


## ६५. अंड्यांची अजब राखण

बदके व ऑस्ट्रेलियातले 'रेनबो' सारखे पक्षी आपल्या अंड्यांची राखण शिताफीने करतात. आपण दूर गेलो असताना घरट्यातली, आपली अंडी कुणी दुसऱ्या प्राण्याने खाऊ नये किंवा पळवून नेऊ नये म्हणून हे पक्षी अंड्यांवर आपली विष्ठा टाकून ठेवतात. या विष्ठेला अतिशय घाणेरडा असा उग्र वास येतो. त्या घाण वासाला बुजून कुणीही प्राणी त्या अंड्यांच्या वाटेला जात नाही.

## ६६. पक्ष्यांचे माहेरघर – मादागास्कर


मादागास्कर बेटावर वेगवेगळ्या ३०० जातींचे पक्षी आढळतात. त्यातले निम्मे पक्षी जगात दुसरीकडे कुठेही न सापडणारे असे आहेत.

फुलपाखरे तर ८०० जातींची आहेत.



# ६७. दगड-लाकूड पचवणारा एमू

ऑस्ट्रेलियात आढळणारा एमू पक्षी, रंगीबेरंगी पंखांमुळे भारी आकर्षक दिसतो. या पक्ष्याची पचनशक्ती अजब आहे. लाकूड, दगड व सिमेंटसुद्धा हा पार पचवून टाकतो. याला उडता येत नाही.





# ६८. विणकर पक्ष्याची सुबक घरबांधणी

गवताच्या किंवा तागाच्या वगैरे तंतूंनी घरटे विणणारा पक्षी म्हणून या पक्ष्याला 'विणकर पक्षी' म्हणतात.

आपल्या चोचीचा कुशल वापर करून चिकाटीने हा पक्षी आपले सुबक घरटे बांधतो. गारुड्याच्या पुंगीच्या आकाराचे हे घरटे झाडाच्या फांदीला टांगलेले असते. वरचा फुगीर गोलसर भाग म्हणजे मुख्य घरटे असून त्याखाली घरट्यात शिरण्यासाठी नळकांड्यासारखा लांबट भाग असतो. पण या नळकांड्यातून जाणारी वाट सरळ घरट्यात पोचत नाही. त्यासाठी चोर वाटेने चोरकप्प्यात शिरावे लागते. या चोरकप्प्यात मादी अंडी घालते व तिथे शत्रूला शिरकाव करून घेता येत नसल्याने अंडी सुरक्षित राहतात. तसेच वाऱ्यावादळातसुद्धा, जरी घरट्याने जोरात हेलकावे खाल्ले तरी अंडी सुखरूप राहतात दुसऱ्या कोणत्याही पक्ष्याच्या घरट्यापेक्षा विणकर पक्ष्याचे हे घरटे कितीतरी जास्त मजबूत असते. एका झाडावर अशी असंख्य घरटी आढळतात.

विणकर पक्ष्याचे पंख तांबूस पिंगट असून भुवयांचा रंग असतो पांढुरका. आणि गंमत अशी की उन्हाळ्याच्या दिवसांत, नराचे डोके, मान व छाती मोहक सोनेरी बनतात.

म. ग्रं. सं. ठाणे.
वा. क्र. २६६९ … १८।७।९२
विषय बा वा

## ६९. खादाड समुद्रपक्षी

हेरिंग गल नावाचा समुद्रपक्षी खरे तर लहानशा कोंबडीएवढा असतो. पण त्याची भूक मात्र गरूड व गिधाडे यांच्या एवढी असते. या पक्ष्याची चोच टणक व टोकदार असते. त्यामुळे त्याला मेलेले मासे चोचीने फाडून खाता येतात. सशाची पिल्लेही ठार मारून खाण्यास हा कमी करीत नाही. हा पक्षी २० वर्षांपर्यंत जगू शकतो.


## ७०. पाखरे – माणसाहून ताकदवान!

वजनाच्या दृष्टीने विचार केला, तर जेवढ्यास-तेवढ्या वजनाच्या मानाने पक्षी माणसाहून जास्त ताकदवान असतो. पंखांना आणि छातीच्या हाडांना जोडलेले त्याचे स्नायू चांगले बळकट असतात. त्यामुळे पक्ष्याला, आपले पंख वर – खाली फडफडवीत तासचे तास उडता येते. उडताना फडफडणाऱ्या त्याच्या पंखांची टोके मुडपली जातात. त्यामुळे हवा पाठीमागे सारली जाऊन पक्षी हवेत पुढेपुढे सरकतो. त्याच्या पंखाची वरची बाजू कमानदार असते; तर खालची बाजू सपाट. यामुळे पंखावरची हवा अधिक जोरात सरकली जाते. साहजिकच वरची हवा विरळ होते; आणि त्या विरळ हवेत पंख सुलभतेने घुसू शकतो आणि मग खालची दाट हवा त्या पंखाला पुढे ढकलते. या क्रियेमुळे पक्षी उंच उडू शकतो.



# ७१. पिशवीधारी पेलिकन

पेलिकन पक्ष्याच्या चोचीचे टोक आकडीसारखे वाकलेले असते तर चोचीच्या खालच्या भागाला पखालीसारखी कातड्याची पिशवी असते. चोचीने पकडलेले मासे तो या पिशवीत साठवून ठेवतो.



# वृक्षवल्लींचे जग




* ताड, माड, शिंदी, खजुरी या झाडांना पाम वृक्ष म्हणतात  या झाडांची पाने हाताच्या पंज्यासारखी असतात म्हणून त्यांना पाम वृक्ष असे नाव मिळाले आहे. काही पाम वृक्षांची पाने मात्र पक्ष्याच्या पिसासारखी दिसतात. पाम झाडांच्या जगभर २७०० जाती आहेत.



# ७२. अबब !

पृथ्वीवर सुमारे अडीच लाख जातींची झाडे – रोपटी असून विविध प्रकारच्या प्राण्यांची संख्या सुमारे साडेआठ लाख आहे असे शास्त्रज्ञांना आढळून आले आहे. तरीसुद्धा दरवर्षी नवनवीन वनस्पतींचा व प्राणिजातींचा शोध लागत असतोच. याशिवाय सागराच्या पोटात अजूनही अज्ञात अशा हजारो वनस्पती व मासे असण्याची शक्यता आहेच !



# ७३. नरभक्षक झाड

अफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्याजवळ मादागास्कर नावाचे एक बेट आहे. या बेटाचा काही भाग निबिड अरण्याने व्यापला आहे. त्या जंगलात गेल्या शतकात एक मनुष्यभक्षक झाड होते. या झाडाच्या लांब, निमुळत्या फांद्या समुद्रात आढळणाऱ्या 'ऑक्टोपस' या प्राण्याच्या नांग्यांसारख्या होत्या. कोणताही प्राणीच काय पण माणूसही त्या झाडाजवळ गेला, की झाडाच्या फांद्या आपोआप आवळल्या जात आणि त्यांच्या आवाक्यात आलेल्या प्राण्याला विळखा घालून पकडीत.

या विळख्यात सापडलेल्या प्राण्याची मग धडगत नसे. त्या काटेरी फांद्या, विळख्यात अडकलेल्या प्राण्याच्या अंगात आपले काटे रुतवत व त्याचे रक्त शोषून घेत. अर्थात त्या मारेकरी फांद्या शेवटी त्या प्राण्याचा बळी घेत. म्हणून 'मनुष्यभक्षक झाडाचे बेट' या नावाने पूर्वी हे बेट ओळखले जाई.

मादागास्कर बेटाचा गव्हर्नर असलेल्या चेस सालमन ऑस्बोर्न याने १९२४ साली 'मादागास्करः द लँड ऑफ मॅन-ईटिंग ट्री' या नावाचे पुस्तक प्रसिद्ध करून या झाडाची माहिती जगापुढे आणली.

मध्य अमेरिकेतील निकाराग्वुआमध्ये असेच एक 'प्राणिभक्षक' झाड, तिकडे संशोधनासाठी गेलेल्या डन्स्टन नावाच्या वनस्पतीशास्त्रज्ञाला आढळले या शास्त्रज्ञाचा कुत्रा त्या प्राणिभक्षक झाडाच्या विळख्यात सापडला होता पण डन्स्टन याने मोठ्या हिंमतीने आपल्या सुरीने झाडाच्या फांद्या कापून कुत्र्याची अर्धमेल्या अवस्थेत सुटका केली या घटनेचे वृत्त 'इलस्ट्रेटेड लंडन न्यूज' या वृत्तपत्रात १८९२ साली 'मॅन-ईटिंग ट्री ऑफ निकाराग्वुआ' या मथळ्याखाली प्रसिद्ध झाले होते.

# ७४. सर्वांत जुने झाड

ब्रिसलटोन पाईन जातीची झाडे अमेरिकेत असून ती जगातली अतिशय जुनी झाडे आहेत. फांदीत फांदी गुंतलेल्या यातील काही झाडांचे वय ४,५०० वर्षांचे आहे. पण सर्वांत जुने झाड, कॅलिफोर्नियातील शुभ्र पर्वतावर असून 'मेथुसेला' नावाचे हे झाड आहे ४,६०० वर्षांचे.



# ७५. लाजाळूच्या रोपट्यांची गंमत



उजेड किंवा तपमानामुळे काही वनस्पतींच्या हालचाली होत असतात. क्रॉकस व ट्युलिप फुले तपमान वाढताच उमलतात आणि तपमान कमी होताच पुन्हा मिटतात. डेझी नावाची फुले रात्रीच्या वेळी मिटतात व प्रिमरोझ फुले, संध्याकाळ होताच उमलतात.

लाजाळूच्या (मिमोसा जातीच्या) रोपट्याच्या हालचाली तर विशेष नवलाच्या घडतात. या रोपट्याची पाने दिवसा ताठ उभी राहतात; तर रात्री ही पाने पेंगुळल्यासारखी लवतात यांची दुसरी गंमत अशी, की – दिवसा ताठर असलेली या लाजाळूच्या रोपट्याची पाने, हाताच्या केवळ स्पर्शाने मिटतात व जरा जोराची टपली मारताच देठासह लोंबकळू लागतात स्पर्शाने ती पाने जणूकाही लाजतात म्हणून या रोपट्याला 'लाजाळूचे झाड' असे नाव पडले आहे. स्पर्शाने मिटणारी पाने साधारणपणे तीस मिनिटांनी पुन्हा ताठर बनतात.

# ७६. पांघरुण घेतलेले रोपटे

थंड, बर्फाळ प्रदेशात उगवणारी रोपटी विशिष्ट तऱ्हेची असतात. त्यांची रचना थंड हवेत तग धरून राहण्याजोगी असते. 'कॉबवेब हाऊसलिक' नावाचे एक रोपटे थंड प्रदेशात उगवते. ते बहुतेक सारे बारीक केसाळ जाळ्याने आच्छादलेले असते. त्यामुळे या रोपट्याला थंड हवेची फारशी बाधा होत नाही.

या प्रदेशातील काही रोपट्यांच्या पानांवर मेणाचा नैसर्गिक लेप चढलेला असतो. यामुळे या रोपट्यांतील पाण्याचा फारसा व्यय होत नाही.

# ७७. फुलझाडाची प्रचंड पाने

पाण्यात उगवणाऱ्या जलरोपांची पाने बहुतकरून गोलसर असतात; व ती पाण्यावर तरंगतात. लिली या फुलझाडाची पाने अशीच पाण्यावर तरंगतात. दक्षिण अमेरिकेतील ॲमेझॉन नदीत उगवणाऱ्या लिलीच्या रोपाची पाने सुमारे पाच फूट लांबीची असतात.

## ७८. टाचणी वितळवणारी वनस्पती

ओरिसातील गंधमादन पर्वतावर तिलाईकंद नावाच्या वनस्पतीची मुळे पोलादी टाचणी २४ तासांत पूर्णपणे वितळवून टाकतात.


तिथल्याच दुसऱ्या एका दुर्मिळ झाडाला एकाच फांदीवर पाच प्रकारची फुले उगवतात.

रामायण काळी, राम-रावण युद्धाच्या वेळी हनुमानाने संजीवनी वनस्पती घेऊन जाण्यासाठी याच पर्वतावरील टेकडी उचलून नेली असे म्हणतात.

## ८०. काचेसाठी वापरण्यात येणारे रोपटे

'ग्लासवर्ट' नावाच्या रोपट्यात सोडियम हा धातू बऱ्याच प्रमाणात आढळतो. म्हणून एकेकाळी काचेच्या उत्पादनासाठी या रोपट्यांचा उपयोग करीत.

समुद्रात उगवणाऱ्या या रोपट्याची मुळे बराच चिखल धरून राहतात. या चिखलातून मुळे सोडियम शोषून घेतात.



## ७९. सर्वात मोठे फूल

जगातले सर्वात मोठे फूल असण्याचा मान 'रॅफ्लेशिया' नावाच्या फुलाचा आहे मलेशिया व इंडोनेशिया या देशांमध्ये आढळणारे हे फूल बांडगुळासारखे दुसऱ्या जाडजूड वेलींच्या अंगातील तंतूतून उगवते. या फुलाचा व्यास एक मीटरहून जास्त रुंदीचा असतो. 'रॅफ्लेशिया'चा वास मात्र कुबट असतो.

# ८१. स्वतःचे रक्षण करणारी रोपटी

ब्राझिलच्या जंगलात काही रोपे वनस्पतीभक्षक कीटक व पशुपक्ष्यांपासून विविध रीतीने स्वतःचे रक्षण करतात.

काही रोपट्यांना बारकिशी केसाळ लव असते. ही लव कुणाही प्राण्याच्या अंगाला लागली की खूप खाज उठते. एका जातीच्या खाजकुयलीच्या रोपाला तर अशी लव असणारे बोंड असते. प्राण्याचा धक्का लागून ते बोंड फुटले तर धक्का देणाऱ्या प्राण्याच्या अंगात विष भिनते.

काही रोपांच्या शरीरातच विषारी द्रव असतो तर काहींच्या पानात अत्यंत कडवट द्रव असतो अशा रोपांच्या वाटेला सहसा कुणी कीटक व प्राणी जात नाही

# ८२. ब्राझिलमधील 'टणक' झाडे


ब्राझिलमधील जंगल एवढे अफाट आहे की तेथे आठ हजार प्रकारची झाडे आहेत येथील झाडे जगात सर्वांत 'टणक' मानली जातात. ही झाडे जवळजवळ शंभर फुटांपर्यंत, फांदी फुटल्याविना सरळसोट उंच वाढतात. या झाडांचे लाकूड एवढे जड असते की ते नदीत दगडासारखे बुडते. हे लाकूड तोडणे किंवा कापणे फार कष्टाचे ठरते.

# ८३. लंबू बांबू

शास्त्रीयदृष्ट्या बांबू हे झाड नसून एक प्रकारचे जंगली गवत आहे. बांबूची उंची अत्यंत वेगाने वाढते. केवळ ३ महिन्यांत हवाई बेटांतील बांबू १०० फुटांची उंची गाठतात.




# ८४. एकाकी वृक्ष




अफ्रिकेतील नायजर या देशातील तेनेरे वाळवंटातील एका ओऑसिसमध्ये (वाळवंटातील हिरवा पट्टा) जो एकाकी वृक्ष होता त्याच्या आसपास सुमारे ३० मैलांच्या परिसरात दुसरे कोणतेही झाड नव्हते. सुमारे ३० वर्षांपूर्वी एका वाहनाची धडक बसून तेही उखडले गेले

अंटार्क्टिकामधील कॅम्पबेल बेटावरचे एकमेव झाड स्प्रूस जातीचे आहे. व या एकाकी वृक्षापासून सुमारे १२० मैलांच्या पट्ट्यात दुसरा वृक्ष नाही




# ८५. सर्वांत मोठा निवडुंग


सर्वांत मोठा निवडुंग उत्तर अमेरिकेतल्या वाळवंटात आढळतो. त्याचे नाव साग्वारो असे असून चकलीच्या कांड्यांसारख्या पण जाडजूड अशा फांद्या असलेल्या या निवडुंगाची उंची असते तब्बल ४५ ते ५० फूट.




# नवलाईचे जग

* झुरळ काहीएक न खाता ४५ दिवस तग धरू शकते.
* मच्छर तोंडाने आवाज काढून गुणगुणत नाही तर सेकंदाला ३०० वेळा फडफडणाऱ्या त्याच्या पंखांतून गुणगुणल्यासारख्या आवाज निघतो.
* ब्राझिलमधील जंगलात एका जातीचा कोळी एवढा मोठा असतो की तो पक्ष्यांनाही जाळ्यात पकडतो.










# ८६. सर्वांत मोठे बेट

युरोपच्या उत्तरेकडील 'ग्रीनलंड' हे बेट जगातले सर्वांत मोठे बेट होय. गंमतीची गोष्ट म्हणजे ज्या एका युरोपीय राष्ट्राच्या मालकीचा हा प्रदेश आहे त्या 'डेन्मार्क' राष्ट्रापेक्षा ग्रीनलंड ५० पट मोठे आहे. मात्र २२ लक्ष चौरस किलोमीटर क्षेत्रफळाच्या या बेटाच्या भूभागाच्या केवळ १३-१४ टक्के भागच मनुष्यवस्तीला योग्य असा आहे व या भागात ५१ हजार वस्ती आहे.

ग्रीनलंडचा बाकीचा भाग एकतर डोंगराळ किंवा हिमाच्छादित आहे. या बेटावर तीन किलोमीटरहून जास्त जाडीचा बर्फाचा प्रचंड आकारमानाचा थर आहे. हा थर जर कधी वितळला, तर पृथ्वीवरील सर्व महासागरांची पाण्याची पातळी सहा इंचांहून जास्त वाढेल! या भागात २० मजली इमारतींहून उंच असे हिमनग कधीकधी आढळतात.

# ८७. सागरतळाशी उष्ण पाणी


प्रशान्त (पॅसिफिक) महासागराच्या ज्या भागातून उष्ण पाण्याचा प्रवाह (गल्फ स्ट्रीम) वाहतो, तिथल्या सागरतळाशी असलेल्या खाचा-खळग्यांतले पाणी कमालीचे उष्ण असते. या पाण्याचे उष्णतामान जवळजवळ ३५० अंश सेंटिग्रेड असते. मौज अशी, की हे पाणी अतिशय उष्ण असूनसुद्धा काही जातींचे सूक्ष्म जीवजंतू या पाण्यात आढळून आले आहेत.



# ८८. कीटकांची कमाल !

पृथ्वीवरील कीटकांच्या विविध जाती, प्रकार आणि आकार बघितले की निसर्गाच्या किमयेने मन थक्क होते

पृथ्वीवरील कीटकांच्या जातींची संख्या पक्ष्यांच्या विविध जातींच्या पन्नासपट तर प्राण्यांच्या जातींच्या दीडशेपट भरेल. कीटकांच्या जातींची संख्या वनस्पतींच्या प्रकारांपेक्षाही जास्त आहे.




# ९०. पिसारावाला 'मोरकिडा'

समुद्रकाठच्या खडकांच्या खबदाडीत पाणी साठून राहते. अशा पाण्यात 'मोरकिडा' नावाचा जलचर किडा राहतो. बारीक नळीसारखा हा प्राणी डोक्याच्या बाजूने पिसाऱ्यासारख्या आपल्या नांग्या फुलवतो व त्यांनी आपले भक्ष्य पकडतो. त्याच्या या पिसाऱ्यामुळे त्याला 'मोरकिडा' म्हणतात.

# ८९. घुंगुरट्यांची करामत

शेणातली घुंगुरटी, नर–मादी अशी दोघे मिळून शेणाचे असंख्य कण एकत्र करून त्यांचा चेंडूसारखा गोल गोळा बनवतात. मग तो गोळा, आपल्या पोरांना खण्यासाठी, साठवणीचे अन्न म्हणून एके जागी नेऊन पुरून ठेवतात




# ११. मुंग्यांचे विलक्षण जग

पृथ्वीवर मुंग्याच्या १५ हजार जाती आहेत. यातील बहुतेक सर्व मुंग्या मातीची वारुळे बनवून राहतात. मुंग्याचे वारुळ अनेक चिमुकल्या कप्प्यांचे बनलेले असते.

वारुळाच्या खास मोठ्या कप्प्यात राणीमुंग्या राहतात व इतर लहान कप्प्यांत इतर मुंग्या राहतात. वारुळात कित्येक मोठाल्या माद्या – राणीमुंग्या असतात. त्यांचे काम फक्त अंडी घालणे हेच असते. प्रत्येक राणीमुंगी काही आठवड्यांचा अंतराने तीसेक हजार अंडी घालते. सुमारे दहा वर्षे तिचा हा कार्यक्रम चालतो. नरमुंग्या राणीमुंग्यांशी संयोग साधून त्यांना अंडी घालायला मदत करतात. त्यानंतर नरमुंग्या मरुन जातात. अंडी न घालणाऱ्या मादीमुंग्या कामगारमुंग्या बनतात. लहान मुंग्यांना व राणीमुंग्यांना या कामगारमुंग्या अन्न पुरवितात. मोठे जबडे असलेल्या कामगारमुंग्या रक्षकांचे काम करतात. शत्रूपासून वारुळाचे रक्षण करण्याची कामगिरी या रक्षकमुंग्यांची असते.

मुंग्यांच्या वारुळात हजारो-लाखो मुंग्या असतात. अमेरिकेत मुंग्यांच्या वसाहतीत तब्बल दहा लाख मुंग्या असतात, तर अफ्रिकी लढाऊमुंग्यांची वसाहत दोन कोटी मुंग्यांची असू शकते.

मुंग्या बहिऱ्या असून जवळ-जवळ आंधळ्या असतात. मात्र त्यांचे स्पर्शज्ञान तीव्र असते. तावडीत येणाऱ्या कोणत्याही शत्रू-प्राण्यावर त्या बेधडक हल्ला चढवतात. सैनिकीमुंग्यांच्या तर गांधीलमाश्या, कुंभारमाश्या यांच्याशी जोरदार लढाया होतात.



# १२. फुलपाखरांचे झुंडीने स्थलांतर

काही पक्षी ठराविक ऋतुमानात शेकडो–हजारो मैल अंतरावर स्थलांतर करतात ही गोष्ट आता सर्वांना परिचित झाली आहे. पण फुलपाखरे, राक्षसी माश्या (ड्रॅगन फ्लाय) यांच्यासारखे चिमुकल्या पंखांचे इटुकले कीटकही कधी-कधी दोनेक हजार मैलांपर्यंत स्थलांतर करतात, असे आढळून आले आहे. अर्थात अशा घटना क्वचितच घडतात; पण घडतात हे मात्र खरे.

हे चिमुकले जीव लाखांच्या संख्येत प्रचंड झुंडीने स्थलांतर करतात, अशीही उदाहरणे आहेत. अशी एक–दोन उदाहरणे नमूद करण्यासारखी आहेत, ती अशीः

१९०३ सालच्या जूनमध्ये नॉर्मंडीच्या बेटांमध्ये प्रवास करणाऱ्या एका जहाजाला कोट्यवधी पांढऱ्या फुलपाखरांच्या प्रचंड झुंडीतून वाट काढावी लागली. बऱ्याच मोठ्या भागातील पाण्याच्या पृष्ठ भागावर आणि जहाजाच्या अवती–भोवती सर्व बाजूंनी, वावटळ यावी तशी या फुलपाखरांची अती प्रचंड झुंड दाटीवाटीने पसरलेली होती. शिवाय ही झुंड तब्बल दोन दिवस टिकून राहिली.

'अमेरिकन मोनार्क' नावाची राजेशाही, दिमाखदार फुलपाखरे १९८१ सालच्या ऑगस्टच्या २७ दिनांकाला ब्रिटनमधील इसेक्स परगण्यात अचानक आढळून आली. अशा जातीची फुलपाखरे ब्रिटनमध्ये यापूर्वी कधीच कुणी पाहिलेली नव्हती.

कॅनडातील 'मोनार्क' फुलपाखरे तर हिवाळ्यात अती प्रचंड झुंडीने दक्षिणेकडे — दक्षिण कॅलिफोर्निया व फ्लोरिडापर्यंत स्थलांतर करतात.

'पेन्टेड लेडी बटरफ्लाय' जातीच्या फुलपाखरांचा थवा तर उत्तर आफ्रिकेहून निघतो तो थेट ब्रिटनपर्यंत, एवढेच नाही तर वर उत्तरेकडे फिनलंड व आइसलंडपर्यंत जाऊन थडकतो, असे आढळून आले आहे. हा थवा तब्बल दोन हजार मैलांपर्यंत प्रवास करतो, असे दृष्टोत्पत्तीस आले आहे. याच जातीच्या फुलपाखरांचा एक थवा १९८४ साली कॅलिफोर्नियात आढळला. तो अंदाजे तीन कोटी फुलपाखरांचा होता.



# १३. चुनखडीचा प्रचंड सुळका

अमेरिकेतल्या काही मोठ्या गुहांमध्ये, झऱ्यांच्या आघाताने चुनखडीचे लहानमोठे नक्षीदार सुळके तयार झालेले आहेत. अशा सुळक्यांपैकी न्यू मेक्सिकोमधल्या कार्ल्सबाडच्या भव्य गुहेतला सुळका आजवर आढळलेला सर्वांत मोठा सुळका आहे. हा सुळका सोळा फूट व्यासाचा असून लक्षावधी वर्षांपूर्वीचा आहे असे मानले जाते.


# १४. जगातला सर्वात शुष्क प्रदेश

जगातला सर्वात शुष्क प्रदेश हा एखाद्या वाळवंटातलाच असणार हे उघड आहे. हे वाळवंट आहे चिली देशाच्या उत्तरेकडील भागातले 'आटाकामा' नावाचे वाळवंट.

पेरूच्या दक्षिण सीमेपासून चिलीच्या कोप्यापो नदीपर्यंत उभ्या पसरलेल्या या वाळवंटाची रुंदी ३३ ते ८० किलोमीटर पर्यंत आहे. हे वाळवंट समुद्रसपाटीपासून सरासरी २ ते ३ हजार फूट उंचीवर आहे. वाळवंटालगतच्या डोंगराळ किनाऱ्याजवळून 'हंबोल्ट' नावाने ओळखला जाणारा थंड सागरी प्रवाह वाहतो. त्यामुळे तिथे धुके व दमट हवा असते. मात्र वाळवंटाच्या आतील भागात शुष्कता असते व जगातला सर्वात शुष्क प्रदेश म्हणून हा मानला जातो.

या वाळवंटातील ईकीक या बंदराच्या भागात १९४८ ते १९६८ या वीस वर्षांपैकी १४ वर्षे एक थेंबभरसुद्धा पाऊस पडला नाही. आणि उरलेल्या सहा वर्षांत पाऊस पडला पण तो अवघा इंचभर. वाळवंटाच्या आतील भागात कालामा म्हणून एक ठिकाण आहे. तिथे तर कधीही पाऊस पडल्याची नोंद झालेली नाही.

पण अशा या वैराण प्रदेशात १८३२ च्या सुमारास चांदी व तांबे असल्याचा शोध लागला व आटाकामाने अनेकांना आकर्षित केले. चांदी व तांब्याच्या खाणी, त्यांच्यावर आधारित उद्योग व त्यासाठी लागणारे कामगार यामुळे हा भाग गजबजून गेला व चिली देशही या धंद्यांमुळे संपन्न बनला. तांब्याचे उत्पादन व निर्यात या क्षेत्रातील चिली हा जगातील प्रथम क्रमांकाचा देश बनला आहे.



# १५. पृथ्वीच्या पोटातले उष्णतामान

पृथ्वीच्या भूगर्भातले उष्णतामान, खोलवर जावे तेवढे जास्त-जास्त असल्याचे आढळून आले आहे. काही चाचणी परीक्षांअंती असा निष्कर्ष काढण्यात आला आहे की पृथ्वीच्या पोटात मध्यभागीच्या गाभाऱ्यात ५०,००० डिग्री फॅरनहाईटहून जास्त उष्णतामान असले पाहिजे.

# १७. ज्वालामुखीची रंगीत डबकी


अमेरिकेतल्या 'यलोस्टोन नॅशनल पार्क'मध्ये छोट्या चिखली ज्वालामुखींनी चिखलाची लहानलहान रंगीत डबकी निर्माण केली आहेत. भूगर्भातील वेगवेगळ्या रंगांच्या खनिजांतून हा चिखल उसळून वर आल्याने या डबक्यांना विविध रंग लाभले आहेत. यापैकी काही डबक्यांभोवती मातीचा कठडा बनवलेला आहे. या डबक्यांना रंगीत डबकी म्हणतात.

# १६. ज्वालामुखीची बेटे

कोणे एके काळी, दक्षिण अमेरिकेच्या पश्चिमेकडील प्रशान्त महासागराच्या तळातून ज्वालामुखीचा भयंकर उद्रेक झाला. हा उद्रेक एवढा प्रचंड होता, की त्या महासागराच्या पृष्ठभागावर त्या लाव्हा रसापायी बनलेल्या दगडामातीची चक्क बेटे उगवली. म्हणजे सागरतळापासून सागराच्या पृष्ठभागापर्यंत, बेटे बनण्याइतपत अचाट प्रमाणात लाव्हा त्या ज्वालामुखीतून वर उसळलेला होता.

ज्वालामुखीच्या या उद्रेकातून वर उसळलेल्या लाव्हा रसाचे अनेक लहानमोठे खडक व सुळके या बेटांवर बनले. शिवाय या बेटांवर तब्बल २,००० लहानमोठी विवरे उत्पन्न झाली. लाव्हा रस व गंधकाचे पाणी यांनी ती बहुतेक विवरे भरलेली आहेत. या बेटांवर लहानमोठी सरोवरे पण निर्माण झालेली आहेत.

तुटपुंज्या पावसातही जिवंत राहू शकणारी निवडुंगासारखी रोपटीच या बेटांवर आढळतात.




# १८. उष्ण पाण्याची कारंजी

पृथ्वीवर कित्येक ठिकाणी जमिनीतून उसळणारी उष्ण पाण्याची कारंजी आढळतात. काही कारंजी ठराविक वेळाने उसळतात; तर इतर काही अनियमितपणे उसळ्तात. अमेरिकेतील 'यलोस्टोन नॅशनल पार्क'मधली 'ओल्ड फेथफुल' नावाची उष्ण पाण्याची कारंजी दर पाच-पाच मिनिटांनी उसळ्तात, तर काही २ ते ५ तासांच्या अंतराने उसळ्तात. आणि दुसरी काही दोन-तीन आठवड्यांच्या अंतराने एका आठवड्यात दोनदा उसळी घेतात.

# १९. घरमाशीचा बहुदर्शी डोळा

घरमाशीचा डोळा बहुदर्शी असून त्या डोळ्याला ४००० दर्शक भिंगे असतात. यातल्या प्रत्येक भिंगातून माशीला दृश्य दिसते. त्यामुळे आपल्याजवळची प्रत्येक बारीकसारीक हालचाल तिला आपल्या या डोळ्यांनी टिपता येते.


कुठेतरी पडलेली साखर खाण्यापूर्वी माशी आधी आपल्या पायांनी ती चाचपून पाहते. कारण तिच्या तगड्यांच्या टोकांना जिभेसारखे, पदार्थाची चव घेणारे इंद्रिय असते.



# १००. नावाची नवलाई

ऑस्ट्रेलियात राहणारा 'कांगारू' सर्वांना माहीत आहे. मागच्या लांबलचक पायांनी वाऱ्याच्या वेगाने धावणारा (ताशी ३० मैल), पोटाला असलेल्या पिशवीत पिल्लाला घेऊन जाणारा, विचित्र दिसणारा हा प्राणी जगात इतरत्र कोठेही आढळत नाही. या प्राण्याला कांगारू हे नाव कसे मिळाले?

१७७० साली कॅप्टन जेम्स कुक या संशोधकाने ऑस्ट्रेलियाचा शोध लावला. असे म्हणतात की कॅप्टन कुकने तेथील एका आदिवासी रहिवाशाला या विचित्र प्राण्याचे नाव विचारले. तेव्हा त्याने उत्तर दिले 'कांगारू!', व कांगारू म्हणून या प्राण्याला जगभर प्रसिद्धी मिळाली. ऑस्ट्रेलिया व कांगारू यांचे नाते कायमचे जोडले गेले. पण पुढे जेव्हा ब्रिटिशांनी या आदिवासींच्या भाषेचा अभ्यास केला तेव्हा त्यांच्या लक्षात आले की कांगारूचा अर्थ आहे, मला माहीत नाही! म्हणजे कॅ. कुकला त्या आदिवासीने प्राण्याचे नाव सांगितले नव्हतेच तर तो म्हणाला होता, 'मला माहीत नाही'.



BVBK-0402669